# उत्कर्ष

(निसर्गपर काव्यसंग्रह – भाग २)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**उत्कर्ष** (निसर्गपर काव्यसंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : वैशाख शु. ५, श्री आद्य शंकराचार्य जयंती, शके १९४६
रविवार दि. १२ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-6-4

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



अवघ्या दहा वर्षांच्या कवी म्हणून आपल्या कारकीर्दीत
बालकवी त्याबरोबर श्रेष्ठ निसर्ग कवी म्हणून
ओळखल्या जाणाऱ्या कै. त्र्यंबक बापूजी ठोंबरे
यांच्या निसर्गप्रेमाला हा माझा
निसर्गपर काव्यसंग्रह सादर समर्पित !

# मनोगत

अनेक वर्षांच्या निसर्गाच्या सान्निध्याचा परिणाम प्रत्येकाच्या मनावर वेगवेगळ्या प्रकारे होतच असतो. पण कवीचं मन हे त्याहून निराळं असतं. निसर्गातल्या साध्या साध्या क्रिया सुद्धा कवी मनाला भुलवत असतात आणि त्याच्या मनाला फुलवतही असतात. नकळत एखादं बीज पावसाच्या धारेने रुजून यावं, त्याला अंकुर फुटावा, त्याला पालवी यावी आणि त्याचं झाडावेलीत रूपांतर व्हावं तसंच काहीसं कवितेचही होतं.

कवीच्या मनात खोल कुठेतरी बीज रूपाने असलेल्या भावना या वेगवेगळ्या प्रकारच्या निसर्गकृती पाहून फुलू लागतात, डुलू लागतात आणि डोलूही लागतात. निसर्ग हा माझा अत्यंत लाडका प्रांत. खरं तर दुःखावर फुंकर म्हणा, सुखाचा आधार म्हणा, डोळ्यांना साकार म्हणा, हा निसर्ग प्रत्येक क्षणी लोभसवाणा वाटतो.

झाडं वेली, पानं फुलं, चंद्र सूर्य, तारे आकाश, ऋतू, वेळा, क्षितिज, प्रकाश, अंधार या साऱ्या गोष्टी कवितेत उतरतात आणि त्याचे एक सुरेख काव्यचित्र तयार होते.

माझ्या मनात ठरवून एखादी कविता लिहावी असं कधीच येत नाही, तसे होतही नाही. आपसुक, सहज ती अशी अलगद उतरते आणि ती तिच्याच भावनांच्या आंदोलनात मलाही झुलवत राहते. मला वाटतं माझ्या सर्वाधिक कविता ह्या निसर्गावरच्या आहेत आणि अनेक वर्षांपासूनच जे माझं साहित्यिक व्रत आहे त्यात या निसर्गकविता सातत्याने आपलं अस्तित्व निर्माण करीत आलेल्या आहेत.

कधीतरी वाटतं की या कविता म्हणजे त्या त्या क्षणांचे माझे भावतरंगच आहेत ना ! ते केवळ माझे न राहता आता रसिकांचे होतात आणि रसिकांच्या आत्मानुभूतीला साक्षी ठरतात यातच कविता सार्थ होते. वेद आणि वेदना दोन्ही जाणल्या की कळतात, कळल्या की उमजतात, उमजल्या की आपल्या वाटतात;

निसर्ग असाच आहे. या अथांग निसर्गाच्या सौंदर्याला कवेत घेताना नकळत झालेला हा काव्यप्रवास अनेक वर्षांपासून काव्यसंग्रहाच्या रूपात यावा असे वाटत होते.

कविता उतरण्याची जशी वेळ नसते तसेच तिचे पुस्तक होण्याचेही काही सांगता येत नाही आणि अनेक वर्षांच्या या निसर्गकवितांचा हा काव्यसंग्रह रसिकांच्या ओंजळीत भरभरून देताना मला समाधान वाटते आहे.

माझ्या कवितांवर रोज प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या हजारो रसिकांच्या सदिच्छांचाच हा परिणाम आहे असे मी मानते.

पुन्हा तिथे रमणे आणि पुनश्च रसिकमनावर निसर्गाचं गारुड पाहण्यासाठी जणू हा काव्यसंग्रह उत्सुक आहे असे वाटतेय. खात्री वाटते की माझ्या अन्य काव्यसंग्रहांप्रमाणेच या काव्यसंग्रहालाही रसिकहृदय-सिंहासनाचा ठाव मिळेल.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

काव्यप्रेमी वाचक आपल्या आकलनातून कवितांचा रसास्वाद घेत असतात. तरीही कवीच्या काव्यरचनेचे महत्त्व, त्यामागील उद्देश आणि कवितेच्या माध्यमातून मराठी भाषेचे सौंदर्य खुलवत ठेवण्यासाठी कवितेमागील कवीच्या भावनांचा सारांश आणि संक्षिप्त दृष्टिकोन प्रस्तावनेच्या स्वरूपात असावा असे वाटते.

फुल.. रंग.. चंद्र.. पाऊस.. गारवा.. साजन सजनीपासून ते जीवन जगताना अनुभूत होणाऱ्या तात्विक आणि आध्यात्मिक जाणीवेच्या अल्याड तिरावर ध्यानस्थ बसून पल्याड तिरावरील गूढ सौंदर्यानुभव घेणाऱ्या मंजुषाजी कुलकर्णींचा हा काव्यसंग्रह म्हणजे त्यांना जाणवलेली काव्यात्मसाक्षच जाणवली...

नवरसांचा सौंदर्यानुभव घेत सुंदर एकांत जगणारे त्यांचे कविमन हे नवरसापारचे सुंदर निरंतर शोधत जगत असते. त्यात त्या चिंतन करत काव्य शोधतात. काव्याचे आर्त आराधन होत जाते. कविता संवादी होऊन बोलते. कवीचे हे मनन अंतरातल्या रंगविविधतेची पुष्करणी उकलत उधळत असते. मंजूषाजींच्या देखण्या कविता याच मननातून अनुभव कराव्यात अशा जाणवल्या.

साहित्य क्षेत्रात 'व्रतस्थ कवयित्री' म्हणून ठसा उमटवणाऱ्या मंजूषाजी कुलकर्णी यांचा हा काव्यसंग्रह काव्य प्रगल्भतेचे विविधांगी भाव दर्शनच आहे.

स्वतःतले कवित्व जाणवायला लागल्यापासून त्यांची कविता ही नकळतपणे सहप्रवासी बनत गेली. निद्रा असो वा अबोध अवस्था असो त्या कविता अनुभवत असतात. जगत असतात. त्यामुळेच त्यांच्या कविता गूढ अनुभूतीच्या अंतर्मुख जाणीवेतून शब्दबद्ध झाल्या असाव्यात.

कविता वाचून वाटते, अजून त्यांच्या साऱ्या कविता या साधना असाव्यात. त्या साधनेत ध्यानस्थ आहेत. त्यांच्या प्रत्येक कवितेची प्रत्येक ओळ पैलतिरावरील संपन्नसुंदरतेचा शोध घेत असावी. ती काव्य सौंदर्याच्या पूर्णत्वासाठी आर्त आहे.. विस्तारापेक्षा ती आत खोल खोल अंतर्ध्यानी होत होत स्वतःचाच अंतर्नाद ऐकण्यास अधीर झाली आहे. कवीची आजची कविता ही उद्याच्या प्रगल्भतेची साक्ष असते. खोल खोल आतवर जात ओल शोधण्याचा काव्यध्यास निरंतर नावीन्याचा मागोवा घेत घेत चिरंतन चैतन्य शोधत रहातो. हे सूत्र जेंव्हा स्वभाव बनते तेंव्हा कवी 'प्रपंच आणि अध्यात्म' जाणीवेचा तोल सांभाळत नवनिर्माणासाठी सतत प्रयासशील असतो. तो सर्वात राहूनही तो दिव्य एकांत जगतो आणि अनंतत्वाला किती अंगानी जगता येईल याचा विचार करत चिंतनशील बनतो.

कविता ही शब्दापुरती नसतेच मुळी. येथे शब्दाच्या अर्थान्तरात लपलेले गहन शोधत रसास्वाद घ्यायचा असतो. त्या गहनातला सहज सुंदर स्पर्श जाणवताना अंतरात उमटणारे रोमांच अनुभवायचे असतात.

कविता ही प्रकृती, चेतन, अचेतन यातील जाणवलेले सुप्त भावांचे मन्वंतर असते. ते एका सुखद जाणीवेतून दुसऱ्या सजग जाणीवेला अर्घ्य देत मिटलेल्या नेत्रातून सूर्य पहायला शिकवतात. मंजूषाजींच्या कविता याच जाणीवेला घेऊन प्रवास करणाऱ्या आहेत.

या काव्यसंग्रहातील कविता या कविमनाची एक एक सुंदर प्रतिमा आहे. परकायेची सुख दुःखे ही स्वतःच्या विरह वेदने इतपतच त्यांना मोलाची वाटतात. म्हणूनच त्यांच्या कविता अंगभूत साधनेच्या सहप्रवासी बनत जाणाऱ्या वाटतात.

मंजूषाजींची पहिली कविता त्या चौथीच्या वर्गात असताना साकारली. आपल्याला कवीत्वाचे अंग आहे हा आत्मविश्वास ज्या क्षणापासून त्यांना जाणवला त्या क्षणापासून कवयित्री म्हणून त्या स्वतःच्या प्रेमात पडत गेल्या. त्यांची प्रीत, निसर्ग, कला, संगीत, सौंदर्य, जीवनातील सुखदुःखे, नातेसंबंध, इत्यादी जाणीवेच्या चिंतनात रमत गेली आणि प्रत्येक कवितेची एक एक ओळ श्वासा-श्वासातून अवतरल्यागत साकारली.

कविता निसर्गाची असो वा प्रसंगाची, प्रेमाची असो वा भक्तींची, सुखाची असो वा वेदनेची, मिलनाची असो वा विरहाची ती कवीच्या काव्यात्म भावनेचे उस्फुर्त प्रगटीकरणच असते. मंजुषाजींच्या कविता निसर्गप्रतिमाच्या दालनात रमत रमत प्रेम, विरह, रंग, संग लेवून अलंकारित होऊ लागल्या. त्यांच्या बहुतांशी कविता कोरीव शिल्पागत आकारल्या.

त्यांनी कवितेला त्यांचा सहप्रवासी मानले आणि आपले आत्मविकसन कवितेतून शोधत जगले. त्यांच्या कवितेतून होणारे दिव्यत्वाचे प्रस्फुरण अमर्याद अशा अनंत्वाकडे घेऊन जाणारेच असल्याचे जाणवते. सोपी, सरल, सहज भाषाशैलीची कविता विविध रंगाशी संग करत सावकाश कलात्मक वळण घेत वाचकाच्या मनाला स्पर्शते. बिलगते. मनाची होऊन जाते..

कवयत्रीचे हृदय नवरसापारचा विरह शोधून काढत कवितेमध्ये स्वतःच्या असोशितील पर्यायी पूर्तता शोधत रहाते. काव्यातील अप्राप्याला शोधत काव्यात्म सौंदर्यातील अंतिम बिंदूचा शोध बोध घेण्यासाठी मनात रुजत जाते.

कविता ही कवीमनाच्या सौंदर्याचा दर्पणच असतो. हा दर्पण जेवढा विमल तेवढी कविता निर्मल होत जाते. कविमनाचे सृजन त्यात अवतरत जाते. म्हणून मला कवीची प्रत्येक कविता हा भाव-उत्सवच वाटतो. मंजुषाजींचा हा काव्यसंग्रह कवित्व भावनांचा महोत्सवच वाटतो.

त्यांच्या निरंतर काव्यरचनेचा गौरव जागतिक पातळीवर 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने केलेला आहे. मराठी भाषेप्रति असलेला हा त्यांचा सेवाभाव हा सन्माननीय असाच वाटतो.

काव्य संग्रहातील प्रत्येक कविता ही त्यांच्या कविमनात दडलेल्या सौंदर्यानुभूतीचा पुरावा आपसुकच प्रार्थना बनत जातो..

दाणा दाणा श्वास चालवी,
श्वासासाठी सस्य दे...
भुके पोटी पोट भरता,
ओठी ओठी हास्य दे...

श्वासाला ‘क्षुधा’ असते ही जाणीव प्रार्थनेकडे घेऊन जाते आणि सत्यासाठी ईश्वरीय अनुकंपेची प्रतीक्षा करायला शिकवते. मंजूषाजींची कविता परमसत्यानुभूती अनुभवीत, प्रार्थनेत उतरते. श्वास आणि जाणीवेची सायुज्यता मर्यादापारच्या मनुष्यत्वाचा शोध घेत असते. या शोधातून विलसणारं हास्य देवाकडे त्या मागतात. मला वाटते, जो स्वतःला जाणण्याचा प्रयास करतो त्याचे पारलौकिकतेशी नातं नकळतपणे जोडलं जातं आणि हे मोलाचं नातं जगतं कविमन, अंतर्मुखतेतून आनंद भोगत असतो. हा आनंदच त्यांचा आत्मसोबती बनतो.

मंजूषाजींची कविता फुलपाखरागत तंद्राळलेल्या अवस्थेत काव्यसुमनां-भोवती गुंजन करत जाते. प्रत्येक काव्यभाव फुल बनत जातो आणि रसाळलेले शब्द पराग वेचत स्वतःतच विरत जातात..

फुलपाखरू केलेस देवा
अनंत रे उपकार
चार दिसाचे जीवन दिलेस
सख्य फुलांचे अपार...

किंवा

देही नक्षी रंग सांडले,
भिरभीर उडणे छान...
कलाकृती ही तुझी सुंदर,
फुलपाखरे महान...

कविता वाचताना मी-तू चा अनुबंध सैल होत स्वतःतलं समृद्धत्व शोधत जाते. सुमन आणि ‘फुलपाखराचं तंद्राळणं’ यांच्यातील प्रतीकात्मक रसपान मनातल्या प्रणयाला खतपाणी घालत जाते.

तिचे सुमन स्मरते...
फुल निर्मन फुलते...
देही नक्षी उमटताना,
गूढ काही शहारते...

असंच काहीसं होत जातं. रसिकाच्या रसाळतेला नवा कोरा मधुमास मिळत जातो. वसंताच्या जाणीवेत जगणे बहरत जाते.

ज्ञात आणि अज्ञात यांच्या सत्संगातून निर्माण होणाऱ्या लहरी कवितेत लीलया खेळत रहातात. त्यांच्या कवितेत सांस्कृतिक आशयाबरोबरच दृश्यमानतेचं सामर्थ्य आहे..

आकाशातील चांदण्याची
सुंदर चादर कुणी अंथरली...
निशापती येऊन पहातो
तमस्विनी भुवी हो मंथरली...

कधीही न स्पर्शलेलं चांदणं चादरीगत अंथरण्याच्या कल्पनाविलासातील ऐश्वर्याच्या परिसीमेवर मनाला मिळणारा अंगभूत आनंदच. ज्ञातातून अज्ञाताचा हा अलौकिक शोध जीवनाला गवसलेला परम आनंद नाही तर काय असावा..?

साहित्य क्षेत्रात 'व्रतस्थ कवयित्री' म्हणून ठसा उमटवणाऱ्या मंजुषाजी कुलकर्णी यांच्या कविता संस्कृती, प्रकृती, तत्वचिंतनाचे हळुवारपणे दर्शन करून देत 'सत्' 'चित्' 'आनंदाने' भारून टाकतात.. केशरी, पिवळी, हिरवी, निळी, जांभळी रंगांची मखमल लेऊन त्या अवतरतात आणि निसर्गाच्या सहवासात नकळतपणे सोडून देतात. एक एक कविता कविमनाच्या उन्नयनाचा दाखलाच आहे.

मंजुषाजी कुलकर्णी यांच्या सहज सुंदर काव्यानुभूतीचा हा काव्यनजराणा मराठी काव्यरसिकास दिव्यानुभूती देणाराच ठरावा.

**अशोक अर्धापुरे,**
छ. संभाजीनगर
मो. ९८५०६९५४५४
दि. ०६ मार्च, २०२४

# अनुक्रमणिका


१) गहन बापुडे कोडे ... १५
२) उधाणलेल्या समुंदराला... १६
३) वाटे राधा निळ्या बिलगली १७
४) सानकोवळ्या छटा केशरी...१८
५) प्रेम रंगते वरपांगी ना ... १९
६) तीर खुणा मज जपतो ... २०
७) हवेहवेसे वाटते जीवन ... २१
८) युगायुगांतून भेट सोहळे... २२
९) मन रेशमाचं झालं ... २३
१०) ऊन थोडे पहुडले ... २४
११) निळी मोहिनी सामावी ... २५
१२) पिवळ्या रंगी रंगरंगली ... २६
१३) पहा किती हो विविधांगी... २७
१४) पदतळी माझ्या सडा फुलांचा २८
१५) वसंत गाली हसला ... २९
१६) मना मोहिनी दिसावी ... ३०
१७) भरभरून रसपान ... ३१
१८) नभराणी रंगाळली ... ३२
१९) दोन जीव विसवोत ... ३३
२०) ओढ जांभळी ... ३४
२१) त्या सुखाची रीत गुलाबी... ३५
२२) दृष्टीचे पांग फिटावे ... ३६
२३) टेकवीन माथा चरणी गडे... ३७
२४) विधात्याची जणू आस असे ३८
२५) सृष्टी निळी हो भासली ... ३९
२६) याच सुखाच्या मोहक व्याख्या ४०
२७) मनातले घर मनीच हसते... ४१
२८) हृदय फिकाळले व्हावे ... ४२
२९) जीवनाला रोज भेटी
देत जावी ... ४३
३०) या कमानीची खुमारी
आठवावी ... ४४
३१) वसा जांभळा मी घ्यावा... ४५
३२) मृद्गंध मोहवी मना ... ४६
३३) ऋतूंना बहरा जुंपावे ... ४७
३४) भावकमल उमलते ... ४८
३५) मीलन क्षणभर विरह
अमाप ... ४९
३६) गगनात उंच माझ्या
मनाचा झोका ... ५०
३७) कोटी सुंदर पिसारा ... ५१
३८) म्हणूनही मी बरसून जातो...५२
३९) परमेशाचे देणे सुंदर ... ५३
४०) कधी थेंब हा ... ५४
४१) घे नमन सवितृदेवा ... ५५
४२) शर्वरी गोडी ... ५६
४३) हिरव्या पोपटी रानात ... ५७
४४) हळव्या रेशीमगाठी ... ५८
४५) लुभविते काजवी
राग यामिनी ... ५९
४६) काय सांगावे नभाला
रंग आले ... ६०
४७) रंग प्रीतीचे मी
सारे माळलेले ... ६१

४८) त्या हृदयाने हे
हृदयही चिंब ... ६२
४९) चांदणधागे विणू चांदणे... ६३
५०) नेहमीच राहतील
बहर ऋतूंचे ... ६४
५१) आस उरतंच नाही ... ६५
५२) ठेऊ सांभाळून ठेवा ... ६६
५३) असे सौंदर्या टिपावे ... ६७
५४) त्यासम तोचि
चित्रकार असे ... ६८
५५) आधी आकारते माय ... ६९
५६) नातं अस्संच असावं ... ७०
५७) याला रम्यता हे नाव ... ७१
५८) शरदाच्या चांदण्यात ... ७२
५९) रोज दिस उगवता ... ७३
६०) सृष्टी माया रोज देते ... ७४
६१) जोडू या सख्य शाश्वत ... ७५
६२) चंद्र उतू जाताना ... ७६
६३) कोजागिरीला दे दान ... ७७
६४) चांदणं ... ७८
६५) कशी उतराई त्याची ... ७९
६६) आकाशीच्या निळाईने ... ८०
६७) सोनभविष्य प्रकाशी ... ८१
६८) निसर्ग लावण्येची पेरतो... ८२
६९) तृप्त अंतरीचे डोळे ... ८३
७०) असा वारसा
परिमळांचा धरू या ... ८४
७१) पोरकेपणाला ... ८५
७२) उजळून येता
तेज उजळते ... ८६
७३) रंगरंगुल्या भाव छटा ... ८७
७४) कसे सांगू रे
धुक्या सख्या ... ८८
७५) धुक्याची पहाट
तू होऊन यावे ... ८९
७६) होत रंगां संगती ... ९०
७७) दाणा दाणा
श्वास चालवी ... ९१
७८) आता तुला पटले ना ... ९२
७९) स्वर्ग वेगळा
कुणी पाहिला ... ९३
८०) रोज सकाळी
मोहमोहवी ... ९४



## (१)
## गहन बापुडे कोडे

निळ्याशार सागरात बेटे
सुखे विसावलेली
अथांग सागर अनंत नभ हे
निळाई पसरलेली

बेटांवरती पाचूसम ही
नटलेली हिरवाई
मंद मंदशी वाहत येते
झुळूक थंड थंडाई

वरून पाहता जळावरी जणू
मांडियली रांगोळी
आकार नाही उकार त्यांना
तरीही मोहविते भारी

कधी वाटते फुलले गुच्छ कुणी
अंथरले पाण्यावर
रत्नाकराचे अभिनंदन जणू
बेटाबेटांवर

समुद्र सारा खारा खारा
गोड झरे पाझरती
सृष्टीच्या पालनास दक्ष
ईश कार्ये चालती

असे बेट मज कधी खुणावे
निवांत राहण्या थोडे
आपसुक उकलून येतील मग हे
गहन बापुडे कोडे

दि.०६/१०/२१
सकाळी १०.२२ वा.




## (२)
## उधाणलेल्या समुंदराला

उधाणलेल्या समुंदराला
सीमा कशा बांधाव्या
उसळून वेड्या पिशा जाहल्या
लाटा कशा सांधाव्या

क्षणाक्षणाला भरती येते
भरते त्याच्या उरातून
लाटा सगळ्या त्या हृदयीच्या
जाणती भावना आतून

म्हणून उसळूनी भरात येती
आपटून खडका जाती
संगे किनारा पोटी घेऊन
रोज सीमा लांघती

त्याचे मनसुभे जळी बघ उभे
नभा कवेत घेण्याचे
फुत्कारून तो लहर फण्यांनी
डंख डाव साधण्याचे

तिकडे घाबरगुंडी उडाली
रंग वेगळे आले
रक्त जणू सांघाळून येऊन
नभ लाल केशरी झाले

निळ्या शांत त्या आविर्भावी
भय पसरून हो गेले
अशा खवळल्या सागराने की
आभाळ गिळंकृत केले

रौद्र रूप ते त्याचे असले
थरथरली नभ धरणी
चूक उमगता लागे ओहोटी
ओशाळून जाय करणी

कधी शांत तर कधी रागावून
समुद्र रूपे धरतो
स्वतःच स्वतःच्या बेभानशा
वागण्यास मग स्मरतो

दि.१७/१०/२१
सकाळी ०८.५४ वा.




## (३)
## वाटे राधा निळ्या बिलगली

निळा समुंदर निळेच पाणी
निळाई पसरे निळ्याच गगनी
निळे किनारे निळसर गाणी
निळ्या विशालशा नीलम स्वप्नी

क्षणात वाटे कृष्ण निळाई
नीलकंठ शिव शंकर होई
निळ्या दर्पणी नील कमळ हे
मुखा निखरता बिंब नितळ हे

रंग वेगळे चढती मनावर
निळ्याशार पापण्याही सुंदर
मिचकून थोडे दार मनाचे
निळे प्रेम लाभते निरंतर

हातामध्ये धरुनी हात
जशी निळ्याच्या राधा साथ
किनाऱ्यावरी जलराजा नि
भूमीमध्ये गूज अगाध

जाग निळी ही पेंग निळाळी
मध्येच नभी या स्वर्ण झळाळी
निळे शब्द नि निळ्याच वेळी
निळ्या राजसी गाठ ही जुळली

निसर्गातली जादू किमया
उतरून आली निळ्या कागदी
निळा कुंचला फिरला अलगद
वाटे राधा निळ्या बिलगली

दि.२६/१०/२१
दुपारी ०४.४१ वा.




## (४)
## सानकोवळ्या छटा केशरी

केशराच्या लाटांवरती
केशर पसरून गेले
निळ्या जळाने रंग निळे ते
सारे विसरून गेले

प्रभात झाली सूर्य उगवला
केशर मळे खुलले
दिशा केशरी नभात केशर
पुष्प केशरी उमलले

झाडांवरती तेज केशरी
प्रकाश केशरलेला
उषा उगवता पाठी पाठी
सूर्य तिच्या चालला

सानकोवळ्या छटा केशरी
स्वप्न केशरी झाले
केशर सारे रोज सकाळी
केशराने नहाले

शब्द केशरी गंध केशरी
कविता केशरी झाली
तिच्यासवे ती केसरपराग
आनंदाचे ल्याली

गगन केसरी धरा केसरी
सरी केशरी झाल्या
ऋतू कोणते असले तरीही
केसर राण्या बहरल्या

गाव केसरी भाव केसरी
प्रीत केशरी चिंब
आकाशातील आणि मनातील
केशरी झाले बिंब

दि.२७/११/२१
सकाळी ०७.२१ वा.




## (५)
## प्रेम रंगते वरपांगी ना

रंग केशरी झाडावरती
पाने होऊन सजला
तरूतळीच्या तळ्यात किंचित
अलगदसा तो भिजला

नटला सवरला मोद मोदला
दर्पणी पाहण्या आतुर
नितळ जळातीळ प्रतिबिंबाचा
गवसला त्याला सूर

त्यात पाहुनी रंग मोहूनी
केसर रोमांचित
कधी पानुल्या लाज लाजुल्या
प्रियतम उमटे अवचित

ऋतू प्रियवरा बिलगून जाशी
तुझ्या प्रेयसीला तू
वसंत फुलतो मना भुलवितो
कोकीळ कूजन कुहू कुहू

असे सोहळे प्रीतभारले
सृष्टीच्या अंगावर
प्रेम रंगते वरपांगी ना
अंतरंग रंगावर

दि.१२/१२/२१
सकाळी १०.२६ वा.



## (६)
## तीर खुणा मज जपतो

तीर कुठे संपतो नदीचा
तीर नदीचा नदी तीराची
किती आपदा झेलून जाते
अशी गुणाची नदी धीराची

ती विसावे कुठे कधी अन
कशी कुणाला ठाऊक
तीर एकटा तिचा सोबती
सुखदुःखे बघ घाऊक

वाहत जाणे पुढे पुढे पण
वळणे ठाऊक नाही
एका सागरा भेटण्यासाठी
जगणे उधार राही

जो तो येतो पाप पुण्याच्या
गठडी धुण्यासाठी
माझ्या तळाशी काय साठले
समजून ना घेण्यासाठी

तीर दिलासा तीर भरवसा
साथ न सोडी कधीच
रात्र असो वा दिवस गलबलीत
तीर नदीच्या आधीच

कुणा वाटते बंधन त्याचे
तीर नदीस बांधतो
खरे सांगू का तो तर माझ्या
भावजळा सांधतो

एक सांगते नदी संपते
तीर खुणा मज जपतो
युगायुगांती नदी होती इथे
तीरंच सांगत असतो

दि.२६/१२/२१
दुपारी ०२.५४ वा.




## (७)
## हवेहवेसे वाटते जीवन

धुके पसरले क्षितिजावरती
गतकाळाचे धूसर चित्र
कधी कोण झाले ते शत्रू
कधी अनामिक कोणी मित्र

पैलतीरावर सारे पुसटसे
ऐलतीरावर सारे स्पष्ट
म्हणून वाटते पहावे जवळचे
गतकाळाचे नकोच कष्ट

एक नदी दो काळामध्ये
झुळझुळ नादातून वाहते
काळ सरकतो तिच्या जळासम
प्रवाह घेऊन जगणे वाहते

नाव कधीतरी सहज डोलते
कधी अगणितसे ते हेलकावे
कधी पाय मोकळे सोडुनी
जळात बुडवून काळज्या द्यावे

हिरवीहिरवी हिरवळ दाटे
सुंदर सुंदर गोड क्षणांची
विसरून जाते मीही मरगळ
दुखऱ्या सलत्या बुजऱ्या मनाची

एक मोकळा श्वास मी भरते
शीतल गंधित होते तन मन
कधीतरी असे देत दिलासे
हवेहवेसे वाटते जीवन

दि.०४/०१/२२
दुपारी १२.३८ वा.




## (८)
## युगायुगांतून भेट सोहळे

उन्हे दिवाळी सोनझळाळी
तेज सांडले भल्या सकाळी
वसुंधरेच्या अंगावरती
हळद लागली पिवळी पिवळी

आली आली हळद वरून ही
नवरदेवाची उष्टावलेली
स्वप्नं हरिद्रा तनुवर सांडे
युगंधरा सोहळ्यात लाजली

ती फुललेली जणू मनाने
वृक्षवल्लीची हिरवी वसने
दिली नभाने कांचन दुलई
प्रियेस आपुल्या झाकून नेणे

सौंदर्यावर तिच्या भाळला
नभराजाही सुंदर सजला
विद्युल्लतेच्या मुंडावळी अन
तेज चमकता वेशही धरला

चमचम चमचम करीत चांदण्या
करा हाती घेऊन करवल्या
पृथ्वीवरती वेली साऱ्या
सख्या नवरीच्या हरखून गेल्या

अंतरपाट धुक्याचा धरला
मंगलाष्टकांचा स्वर घुमला
पक्षी कूजन मधुर मधुरतम
धरेस प्रीतीने शहारा फुलाला

अशा सकाळी मंद सोनाळी
विवाह होऊन दोघे रमले
सुवर्णतेजाच्या अक्षत आणिक
स्वर्ग धरेवर मोद उमटले

नजरेला नजरेत भेटले
आकाशाचे पांगची फिटले
अशा गोड नाजूक क्षणांना
लाजून वधूने नयनची मिटले

साक्षी होऊन मांडवातले
वऱ्हाडी लगबग करू लागले
या दोघांच्या सोबत टिपण्या
क्षणचित्रांना धावू लागले

जोडी जमली जन्मोजन्मीची
युगायुगांतून भेट सोहळे
असे देखणे विवाह सृष्टीत
मनास भुलवून जाती न कळे

दि.१२/०१/२२
सकाळी १०.२३ वा.




## (९)
## मन रेशमाचं झालं

हिरवळीच्या कुशीत डोंगराला निज आली
वर आभाळानं माया मेघभर पांघरली

रंग हिरवा सावळा अंग धुक्यात बुडालं
रखरख डोंगराचं मन रेशमाचं झालं

वाट पहुडली होती उगा निवांत निवांत
तिला थंडी भरल्याने झाली निर्जन शांत

तिच्या काठी गवताची एक शाल पांघरली
साऱ्या सृष्टीतून थंड पावसाची लहराली

मन माणसाचं झालं झालं गडद हिरवं
त्याच्या काळजात ढग ओलाव्यानं भरलेलं

विसावा हा शोधताना एक दिलासा लाभतो
ऋतू वेगवेगळाले ऋतुगंध हा वाहतो

दि.१६/०१/२२
सकाळी ११.२२ वा.



## (१०)
## ऊन थोडे पहुडले

हिरवळ दुलई ओढून कोवळे
ऊन थोडे पहुडले
थंडीमध्ये बाहेर येऊन
तेही वेडे कुडकुडले

आई म्हणाली नभराणी ही
उठ उठ बाळा लवकरी
कुडकुडणाऱ्या सृष्टीला तू
ऊब द्यावी झडकरी

बाबा सूर्यही म्हटले आवर
लवकर कर तू कामा
वेळ माझीही असते ठरली
वेळ ना मजला गमन्या

थांबा थोडे आई बाबा
दव हे गारवा देती
आपसुक मजला पांघरुणातच
मऊ मऊ दडवून घेती

थंडीमधली सकाळ थोडी
अशीच रमते गमते
म्हणून तर या कोवळ्या उन्ही
सृष्टी सारी रमते

दि.२७/०१/२०२२
सकाळी ०९.४९ वा.



## (११)
## निळी मोहिनी सामावी

निळ्याशार आभाळाची धुंद सफारी करावी
झेप पंखात भरून आसमंती घे भरारी

निळ्याशार सागराची मुशाफिरीही करावी
थवा मनी भावनांचा स्वप्नं पाखरं कोरावी

निळ्याशार डोहामध्ये निळा सावळा श्रीहरी
निळ्याशार मोरपिशी राधा प्रीत भाव भरी

निळ्या पापण्या आडून निळे नभ डोकावते
निळ्या चांदण्यात निळी चांदणी अशी मावते

निळ्याशार प्रकाशात निशा गुंग दंग होई
निळ्या आठवात सारी  निळी मोहिनी सामावी

दि.१०/०२/२०२२
रात्री १२.४१ वा.



## (१२)
## पिवळ्या रंगी रंगरंगली

रंगाला ना बंधन कसले
जो फुलतो तो सुंदर
हिरव्या पानांवरी पसरली
हळद कोवळी खरं तर

खाली सांडली उगा भांडली
भाव हळदुले नाजूक
तिच्या भावना अति मल्मली
सृष्टी तिची बघ साजूक

स्वतःच उमलून डवरून गेली
फांदी फांदीवर
चित्रकार कुणी रंगकुंचला
फिरवीत वरचेवर

रस्त्यावरती पसरून गेली
पिवळी कांती तल्मली
मार्ग असा मी सहज चालले
हळद नसे एकली

रंग बोलती मना सांधती
आयुष्यावर फिदा
पीत सोनेरी सौंदर्याच्या
किती अजब ह्या अदा

कांचनमन जणू होऊन गेले
हा बहावा पहा
पिवळ्या रंगी रंगरंगली
इथली मादक हवा

रंग गुलाबी मक्तेदारी
नाही मुळीच प्रणया
रंग आपुले गुज सांगती
ऐकू येई मनी या

दि.१२/०२/२०२२
सकाळी ०६.१७ वा.



## (१३)
## पहा किती हो विविधांगी

पहा किती हो विविधांगी
निर्माण केलीत ही वांगी
नानाविध बुडूनिया रंगी
चव निराळी त्या अंगी

कुठून जन्मा ये सुंदरता
मातीमधली अभिजातता
रंग निराळे, ढंग निराळे
तिच्या कुशीतून सारे डवरता
तत्त्व ईश्वरी मृण्मयी सांगी

पहा किती हो विविधांगी
निर्माण केलीत ही वांगी

जरी नाव हे एक असे
कुणी कुणासारखे नसे
चैतन्याची खूण दिसे
असा कुणीतरी ईश वसे
आत डोकवा न वरपांगी

पहा किती हो विविधांगी
निर्माण केलीत ही वांगी

विक्रेता खरा मालक की
सृष्टी निर्माती हो आई
कुणीही कुणावर सांगे मालकी
खरा तो स्वामी असे वरती
आवाज अंतरीचा वानगी

पहा किती हो विविधांगी
निर्माण केलीत ही वांगी

दि.१६/०२/२०२२
सकाळी ०८.२२ वा.




## (१४)
## पदतळी माझ्या सडा फुलांचा

असा फुलू दे वसंत जीवनी
रंग भरा येऊ दे
पदतळी माझ्या सडा फुलांचा
रेशीम तलम उमलू दे

स्पर्श कोवळे किती मल्मली
मन माझे बहरू दे
तुझ्यासवे ही सृष्टी सारी
मुक्तपणे विहरु दे

साथ असावी अशी बोलकी
शब्द नको मोजूनी
बघ डवरून जे आले फुलोरे
मोहून नेती अजुनी

हात असावा हाती माझ्या
जन्मोजन्मीची वचने
या फुलांच्या आणि ऋतूच्या
स्मृतिफुला वेचणे

माझ्या डोळ्यांमध्ये फुलावे
स्वप्न असे वेगळे
तू मी मी तू असू सोबती
क्षण सुंदर आगळे

सहज विसावे मन हे माझे
इथे तुझ्या संगती
उभा तरू हा ऋतुराणीच्या
खुणा ल्येत अंगती

किती कोवळे तलम भाव हे
मन माझे गहिवरे
गळत अश्रू मग आनंदाने
होत मोती सावरे

अशा क्षणांवर आयुष्याने
स्वतःस झोकून द्यावे
हळुवार या फुला पाकळ्या
मनी साठवून घ्यावे

दि.१९/०२/२०२२
सकाळी ०९.३७ वा.




## (१५)
## वसंत गाली हसला

फुले सदा ही रंगीत सुंदर
पाने तशीच झाली
बगीच्यामध्ये ऋतुराणीच्या
बहरा वर्दी  आली

रंग केशरी पानोपानी
असा सजुनिया बसला
रंग गुलाबी लेऊन पाने
वसंत गाली हसला

हिरवी पिवळी गर्द जांभळी
रंग होळी जणू चाले
सृष्टीमध्ये पिचकारीने
श्रीरंगचि हा खेळे

पदतळी सांडे सडा मखमली
प्रीत फुलुनिया आली
भावफुलांची मनात सारी
गर्दी अवचित झाली

असे वाटते सुख मज पायी
राजसा तू अंथरावे
प्रीतीचे हे धाम कधी ना
जन्मोजन्मीही सरावे

इथल्या आठवणींनी फुलुनी
यावे वेळी यावेळी
साद मनाची ऐकून धावे
राधेसाठी श्रीहरी

दि.०१/०३/२०२२
सकाळी ०५.५७ वा.



## (१६)
## मना मोहिनी दिसावी

हिरव्या हिरवाई राणीने
लावली हळद ठळक
कुंकू लवियेला टिळा
झाला सोहळा अलग

तिचा शालू हिरवा बरवा
ऋतू फुलण्याचा आला
ताजीतवानी ती होई
गंध मनातून ओला

गावोगावची पाखरं
गेली भुलूनी वेडुली
लाजलाजुनी मुरडे
उगा अंधारी झाडूली

तिच्या अंगावर आज
सोनफुलांचा हा साज
लाल चुटुक बुट्ट्यांचा
शेला पांघर रिवाज

आली आली ती वयात
कुणी राजस मनात
हळव्या स्पर्शाची ही रीत
वारा झुलवी रानात

तिच्या मनातलं गाणं
पाखरांनी गायिलेलं
भुंगे वर्दी देत गेले
कळी गाव उमलेलं

नववधू सजलेली
दृष्टी नवीन असावी
भाव गुंतून राहता
मना मोहिनी दिसावी

दि.१३/०३ /२०२२
रात्री ०८.५० वा.



## (१७)
## भरभरून रसपान

धुंद फिरावे फुलाफुलांवर
पराग कोशातुनी
रंग सोहळे टिपून घ्यावे
लुकलूक डोळ्यांतुनी

स्पर्श रेशमी अंग कोवळे
फुले स्वर्ग सांगती
जन्म सरावा सुंदरतेने
सुमनांच्या संगती

दिनमणी उगवून आला घेऊन
नव चैतन्या दिशा
पसरून गेली रक्त लालिमा
गाली हासते उषा

फुले डवरूनी वाट पाहती
येतील फुलपाखरे
ज्याच्यासाठी यौवनमधु हा
त्याची वाट पाहणे खरे

फूलपाखरू केलेस देवा
अनंत रे उपकार
चार दिसांचे जीवन देऊन
सख्य फुलांचे अपार

देही नक्षी रंग सांडले
भिरभिर उडणे छान
कलाकृती ही तुझीच सुंदर
फुलपाखरे महान

क्षणोक्षणी जर घडे सुखाचे
स्वच्छंदाचे दान
जीवन असू दे कितीही छोटे
भरभरून रसपान

दि.१५/०३/२०२२
सकाळी ०७.१९वा.



## (१८)
## नभराणी रंगाळली

नभराणी रंगाळली, जरा जरा पेंगुळली
झुळझुळणाऱ्या झऱ्या काठी अशी रेंगाळली

तिचे रंग सांडलेले, तिचे स्वप्नं रंगलेले
तिच्या भावनांचे धागे, रेशमाने सांधलेले

तिची उसंत निवांत, तिचे मन शांत शांत
तिचा राजस कवेत, आज तोही हो प्रशांत

तिचे हास्य हो सालस,रूपरंग निखालस
खळी खुलते केशरी, चंद्र चांदण्या विलास

सांज मंद मंदावते, निशा धुंद धुंदावते
अंग अंग चेतवीत, रती मदना पावते

झरा कावरा बावरा, मिठी तिची घट्ट झाली
नभराणी उतरून, त्याच्यासाठी खाली आली

एक प्रणय गोडवा, दृष्ट लागू नये त्याला
रंग का बरे खुलले, कळू आले हो झऱ्याला

दि.३०/०३/२०२२
सकाळी १०.१३ वा.



## (१९)
## दोन जीव विसवोत

अस्सा प्रवास प्रवास
आसमंतात सुवास
सांज केशराळलेली
नववधूचा आभास

निशाकरासाठी तिचे
झाले षोडश शृंगार
वारा शीतल तरीही
अंगी चेतला अंगार

एक नाव मदनाची
त्याच्या टोकावर मीही
टोक दुजे गाठायाचे
जिथे वाट पाहे तीही

जल भाव विभावांचे
त्यात अगणित लाटा
आज मीलने होतील
एकरूप दोन वाटा

दोन टोकांचे अंतर
असे सहजी मिटेल
दुःख अंधाराचे मग
अलगद हो फिटेल

कळतील तुला भाव
शब्द मौनात राहोत
दशदिशा हा सोहळा
नेत्र मिटून पाहोत
दोन जीव विसवोत
दोन जीव विसवोत

दि.३१/०३/२०२२
सकाळी ०७.५२ वा.



## (२०)
## ओढ जांभळी

झाडे जांभळी पाने जांभळी
फुले जांभळी, रात जांभळी

भुईवर पसरून, दुलई जांभळी
चंद्र प्रकाशी, चांदणी जांभळी

लळा जांभळा, मळा जांभळा
पौर्णिमेतला चंद्र जांभळा

तेज जांभळे, स्वप्नं जांभळे
स्पर्श जांभळे, जळही जांभळे

जांभूळ गोष्टी, वेळाही जांभळ्या
जांभुळबनी, प्रीतकथा जांभळ्या

रंग कोणते, सांग प्रीतीचे
हास्य रतीचे, बघ ना जांभळे

मदन जांभळा, बाण जांभळे
जाळे जांभळे, कोडेही जांभळे

अंगावरती, रंग जांभळा
मनात माझ्या, संग जांभळा

रीत जांभळी, प्रीत जांभळी
जांभळ्यातली, ओढ जांभळी

दि.०६/०४/२०२२
सकाळी ०८.२६ वा.




## (२१)
## त्या सुखाची रीत गुलाबी

रंग गुलाबी ढंग गुलाबी
संग गुलाबी अंग गुलाबी
ऋतू गुलाबी सृष्टी गुलाबी
वचन गुलाबी स्पर्श गुलाबी

असे पाहुनी उमलून येते
स्वप्न मनातील होत गुलाबी
सदैव देशील संख्या मला तू
साथ तुझी रे अशी गुलाबी

जुळून येतील नाती आपुली
त्या नात्यांचा गंध गुलाबी
रेशीम जोडून देईल धागे
त्या धाग्यांचा पोत गुलाबी

हसणे माझे झुळूक सुखाची
त्या सुखाची रीत गुलाबी
मनात सहजी फुलून येता
अवचित होईल प्रीत गुलाबी

जीवन सहजी सुंदर होईल
रंग मनातून सजीव गुलाबी
तू मज नाही दुजा वेगळा
जीव जीवापाड होय गुलाबी

रंग एकदा चढला की मग
उतरत नाही कधी गुलाबी
खोल खोल गहिऱ्या डोहातील
हलचल चंचल होय गुलाबी

दि.०७/०४/२०२२
सकाळी ०९.५७ वा.



## (२२)
## दृष्टीचे पांग फिटावे

रंग सोनेरी सजला लेऊन
वर्ख सोनपिवळाले
झाडे पाने फुले जाहले
पिवळे वर्ण फळाले

हे कसले बघ रूप वेगळे
नवे नवे बहरावे
रंग रूप सोनेरी चमकते
मार्ग दुतर्फा भरावे

हिरव्या पानांनीच टाकली
कात एकदाची का
फुले होऊनी उमलत गेले
बदल सुखावती नाही का

पीतांबर नेसून पूजेला
जणू बसले यजमान
रांगा दोन्हीकडे सारख्या
निसर्ग मंगल गाण

कुठल्याही रंगात रंगुनी
मनात घर रंगवावे
सृष्टी करते रंग सोहळे
दृष्टीचे पांग फिटावे

दि.२१/०४/२०२२
सकाळी ०७.५८ वा.



## (२३)
## टेकवीन माथा चरणी गडे

किती खुजी मी, तुझ्या भुजांच्या
विशाल मायेपुढे
टेकवीन माथा चरणी गडे

तू सृष्टी नच जननी आमुची
भाग्य असे केवढे
टेकवीन माथा चरणी गडे

तुझ्या रक्षणासाठी घ्यावे
वचन आम्ही तेवढे
टेकवीन माथा चरणी गडे

देणे आहे तुझा स्वभावच
फुलणे नित्यचि घडे
टेकवीन माथा चरणी गडे

तुला सुखविता सुखवीशी आम्हा
पदतळी टाकीशी सडे
टेकवीन माथा चरणी गडे

दि.२३/०४/२०२२
सकाळी ०७.२१ वा.




## (२४)
## विधात्याची जणू आस असे

या सुखाला काय म्हणू मी
अन्नचारा उगवला
पहावे तिकडे ताज्या ताज्या
गवतराजी उमलल्या

फुलली राणी सृष्टी सारी
हिरवी स्वप्ने पहुडली
नयनसुख हे पाहून सुंदर
किमया वेगळी अशी घडली

ते पाण्याचे पाट वाहती
डोंगरावरून धरणीवर
धुके पसरुनी गेले वरती
नभांगणाच्या सरणीवर

असे वाटते पक्वान्ने मज
साठी येथे मांडियले
निसर्गराजा किती उदार तू
जिवामुखी घास धाडीयले

नको काळजी उगा उद्याची
खरेच जगणे आज असे
हिरव्या रंगामधुन डोलती
विधात्याची जणू आस असे

दि.२६/०४/२०२२
रात्री ०९.३३ वा.



## (२५)
## सृष्टी निळी हो भासली

नीलवर्णी आकाशात, निळी जांभळी दुलई
तिचा आरसा सजतो, खाली सरोवर बाई

निळ्या निळ्या आकाशाची, छबी निळीदार निळी
एक उमले कमळ, एक उमलती कळी

त्याच्या नक्षत्रांनी आज, रंग निळा पांघरला
खाली वाकून पाहता, तारा तारा गांगुरला

मग गिरीवर सारे, निळ्या दालनात गेले
निळ्या रंगात न्हाऊन, निळेशार निळे झाले

झाडे वरमली थोडी, म्हणे पाहू निळी गोडी
दडवून हिरवाई, निळी ओढली अंगडी

आज जाग निळी आली, पहाटही निळी झाली
निळ्या आकाशासवेच, सृष्टी निळी हो भासली

दि.२७/०४/२०२१
सकाळी ०८.२७ वा.



## (२६)
## याच सुखाच्या मोहक व्याख्या

एक पुष्प प्राचीवर खुलता
धरातली उमलली ही सुमने
ती सारी कलिकांची हास्ये
लेऊन सजली रेशीम लेणे

एक तेज प्रगटले अंबरी
एक तेज डुलले भूवरी
रोज चालतो खेळ खेळकर
पुष्पांसाठी वेडा दिनकर

टवटवीत चैतन्ये दिसती
वृक्षवेली फुलती अन फळती
प्रकाश पसरून दिशा उजळता
आयुष्याच्या उजळती वाती

कुणास पहावे इतुके सुंदर
नक्षी फुलांची ही धरणीवर
नक्षत्रांनी मिटून स्वतः
नभी बांधले सविता झुंबर

याच सुखाच्या मोहक व्याख्या
अन आनंदाच्या परिभाषा
जपून ठेवा क्षणक्षण मौलिक
जतन करावी हृदयमंजूषा

दि.०४/०५/२०२२
सकाळी ०७.२४ वा.



## (२७)
## मनातले घर मनीच हसते

आखीवरेखीव सुरेख घरकुल
निसर्ग संगती पक्षी किलबिल
पाहताच वाटे घर माझे
होईल का कधी बांधून स्नेहल

असेच स्वप्नामधे हे दिसते
मी रमलेली सदैव असते
कुणी मनातील साथी सोबत
मीही घरी या विसावून बसते

वर मोकळे नक्षत्रांचे
अंगण नभीचे उतरून यावे
आणि धरेवर हरित दुलई
हिरवळीने मग पसरून जावे

श्वास मोकळे घेण्यासाठी
किती दालने खुली असावी
नजर मोकळी धावविण्याला
खिडक्यांची नक्षीही दिसावी

मन रमावे घरात सुंदर
आसमंतीही सुंदर परिसर
घर मनीचे मन स्वप्नीचे
स्वप्नं रातीचे रात निरंतर

पहाट होता घर ना दिसते
मनातले घर मनीच हसते
साथी मनाजोगता मनातच
सहजीवन मग मनात वसते

दि.०५/०५/२०२२
रात्री ११.१३ वा.




## (२८)
## हृदय फिकाळले व्हावे

रंग बोलती सृष्टीमधले
किती विविधता त्यांची
स्पर्श रेशमी कोमल काया
तलम भाव पोचती

फिक्या गुलाबी रंगावर ह्या
मनही हळवे व्हावे
फिक्या भावना फिक्या जाणिवा
हृदय फिकाळले व्हावे

गडद रंग दुःखाचे सारे
टोकदार ते भाव
सहज सुखाचे रंग कोणते
फिके रंग हे नाव

मन होते मग हलके हलके
उडते झुळुकेसवे
रंग पसरती भावरेशमी
दवमाला भासते

तेज चमकते रंग फिक्यातून
प्रकाश पसरून जाई
फिका गुलाबी रंग प्रियेच्या
अधरी विसरून जाई

दि.१५/०५/२०२२
पहाटे ०५.०३ वा.




## (२९)
## जीवनाला रोज भेटी देत जावी

रंगरूपे सुंदराचे साजिरे हे
पीत पाचू वर्ण सारे अंथरावे
ह्या भुईने स्वर्ग खाली आणवावे
कामनांचे कुंचले हे जाणवावे

एक सोन्याची ग धारा पाझरावी
एक धारा रूप ल्याली ओसरावी
सूर्य तेजाच्या पखाली वाहतो ना
साज ल्येल्या गोड राणी पाहतो ना

हात येथे टेकवून तो वाकलेला
प्रीतखाणीतून गर्भा झाकलेला
वाढला की वाढवेडा कोंब प्यारा
एक सोना एक हारीतास झेला

टाकुनीया चोरचोरी पावलांना
यौवनाच्या ज्या खुणा ह्या पावलेल्या
पाह ना तू लाजलेले मंद वारे
साक्ष सारे स्वर्गभूमी मीलनाला

मी विसावा रोज घ्यावा या सकाळी
अंगअंगी घेत जावी ही झळाळी
जिंदगीची आस मोठी  वाढणारी
जीवनाला रोज भेटी देत जावी

दि.२०/०५/२०२२
रात्री ११.२० वा.



## (३०)
## या कमानीची खुमारी आठवावी

या कमानीला तुम्हाला भेट देणे
एक वेडे सौख्य पायी लांघवीणे
तोरणे बांधून झाडे वाकलेली
सावलीच्या सोहळ्याला साक्ष देणे

ते उन्हाळे संपती ना तप्त ज्वाळा
वाहनांच्या शर्थ होती धावण्याला
एक थोडा भाग ऐसा झाकलेला
कंच पाचू रंग त्याते माखलेला

चाळण्या की गाळण्या त्या आतपाच्या
थंड वाऱ्या धुंद साऱ्या हुंगण्याच्या
पाखडावे ऊन सारे या सुपाने
आणि धान्ये चांदण्याचे घेत जाणे

वाटते की मार्ग हा ना संपणारा
हा ठरावा जीवनाला सांगणारा
भोगिले जे दुःख ते ते सोड मागे
या कमानीला न काही तोड राजा

वाटते येथेच यात्रा गोठवावी
देखण्या रस्त्यात चित्ते पाठवावी
चालणे ते चालणे ना थांबताना
या कमानीची खुमारी आठवावी

दि.२४/०५/२०२२
सकाळी ०८.०९ वा.



## (३१)
## वसा जांभळा मी घ्यावा

छटा जांभळी जांभळी
रंग जामुनी गाभूळी
गुच्छ पुष्पांचे हासले
उमलून कळी कळी

मनी वाटते असे की
साडी सुंदर नेसावी
रंग जांभळा दिसावा
फुले त्यावरी असावी

काय किमया ती त्याची
रंग कोठून आणतो
माती भुरी काळी परि
रंग सारेच जाणतो

कधी वाटे हेवा साऱ्या
रंग मोहिनीचा जरा
किती विविधता त्यांची
किती छटा त्या सुंदरा

केशकुंतलात कधी
रंग जांभळा खुलावा
फुले माळताच सखा
पुन्हा पुन्हा की भाळावा

प्रीत जांभळी फुलावी
बाग जांभळी उमलावी
उमलत्या भावनांनी
साद जांभळीच द्यावी

स्वप्नं माझे हो जांभळे
जांभळाच श्याम व्हावा
राधा ल्येत जांभळाई
वसा जांभळा मी घ्यावा

दि.२५/०५/२०२२
सायं ०४.५४ वा.



## (३२)
## मृद्गंध मोहवी मना

मृद्गंध दरवळे जेव्हा
मज ओढ वेगळी वाटे
का उगाच मातीसंगे
जडे एक अनामिक नाते

ते थेंब मृगाचे पडता
अत्तर कुपी मृण्मयी उघडे
तो दिव्य सुगंध पसरता
वाजती  सुरभी चौघडे

मृद्गंध मोहवी मना
मन धुंद होऊनी जाते
ओलावा प्रीतीने भरला
ते गीत तयाचे गाते

स्मृती मनी दाटुनी
मज मनी पावसाळा ये
त्या तुझ्या नि माझ्या भेटी
पावसास चाळा लागे

मृद्गंध खूण परिमळते
मी क्षणात हरवून जाते
ते वातावरण प्रफुल्लित
मृद्गंधी मी हरखून जाते

मृद्गंध जणू सुरुवात
नव नात्यांची रुजवात
मृद्गंध हुंगताना तो
ऋतू गाभूळलेला आत

दि.२८/०५/२०२२
सकाळी ०८.४९ वा



## (३३)
## ऋतूंना बहरा जुंपावे

बहरला आसमंत सारा
गाभूळला वेडापिसा वारा
ढगाने गाळल्या गारा
फुलविला मनाने पिसारा

फुलांच्या कोंदणी गंध
प्रियेच्या हृदयी हृदय बंद
मोहवी कस्तुरी सुगंध
प्रिया सहवासाचा छंद

रंग सारे सारे खुलले
फुलेही हळूवार उमलले
पाखरं फुलांवरी भुलले
लाजुनी फुलं जरा वळले

धुंद परागांच्या कोशी
भृंग पुष्पांच्या बाहूशी
कळी कळी होतसे कसनुशी
लपेना लपवूनी ही खुशी

बहर हे कधी न संपावे
प्रहर हे सदाच गुंतावे
मनोरे आशेचे उंचावे
ऋतूंना बहरा जुंपावे

दि.०१/०६/२०२२
सकाळी ११.५९ वा.



## (३४)
## भावकमल उमलते

स्पर्श तुझा रे हवा फुलांना की
स्पर्श तुला रे फुलांचा
असे चांदणे उधळीत येशी
चांद उजळ पुनवेचा

ते तुझे सदा भरणे शीतल
प्रकाश अन तेजाने
पुन्हा लुप्त होऊन कितीदा
नभी गडपही होणे

वाट पाहते रमणी कोणी
कुणी प्रियेची प्रियवर
जीव टांगणी लागून जातो
ढगात अडतो तू वर

किती दूर तू किती जवळ रे
कसले आपुले नाते
तुला पाहता मना उभारी
भावकमल उमलते

उगाच छळसी बसून गगनी
तळमळणारे प्रियतम
शिकून घेशील भेटवण्याची
कला तू पटकन प्रियजन

होतील अनंत उपकरही हे
तुझे रसिक या दिलावर
काव्यप्रीतविरहाचा विषय तू
तुजविण रात जिवावर

दि.०६/०६/२०२२
सकाळी ०८.१३ वा.



## (३५)
## मीलन क्षणभर विरह अमाप

खळखळणारी नदी होऊनी
गिरीराजाच्या वहावे कुशीतून
किती संपन्न करणे स्थानंही
पावन आपुल्या जळ मुशीतून

क्षण एकदा फक्त भेटतो
आलिंगन मग द्यावे मनातून
पुढे सरकता नदी न फिरते
माघारी त्या निज प्रवाहातून

जरी वाटले थांबावे पण
गती तिची ती चालत रहाते
उगमापासून विलयासाठी
नदी एकटी वाहत रहाते

मनात असतो सागर भरला
तनात उत्साहही मग स्फुरला
त्या भेटीची ओढ ओढते
थेंब थेंब तिचा सागरलेला

पुन्हा नभाशी ढगात मिसळून
स्वतःस पुरते घेता घुसळून
पुन्हा बरसणे पुन्हा तरसणे
चक्र प्रीतीचे युगयुगी गवसणे

मीलन क्षणभर विरह अमाप
तरीही जीवाला आस की शाप
पुन्हा पुन्हा मन नदी होऊनी
धावत जाते राजसा पास

दि.२१/०६/२०२२
सकाळी ०८.२४ वा.



## (३६)
## गगनात उंच माझ्या मनाचा झोका

काळ्या निळ्या आभाळाची दमदाटी
पांढऱ्या ढगांची हकालपट्टी
आवाज गर्जना गंभीर खूप
रुद्र भयानक त्या मेघांचं रूप

उरात धडधड उडवीत जाती
पाण्याच्या घागरी ढवळत नेती
वरुण राजाचं सैन्यच जणू
हातात जळाचे भाले नि धनू

सूर्याची किरणं सोनेरी तार
अडकून ढगांच्या गुंत्यात पार
मधेच चमकून जराशी दमकून
इंद्राची कमान दिमाखात उमटून

भरलेला सागर धरणीशी खाली
खवळला सागर आकाशी वरी
अंधार पुरा ना उजेड जरा
सर सर येतील भुईवर गारा

पावसाचे नखरे सतराशे साठ
रिमझिम रिपरिप तहानले काठ
डोकावून जातो कधी झोडपून टाकी
वरात काळ्याकुट्ट ढगांची बाकी

ये ना तू ये रे दिलासा देत
प्रियेच्या मनाचा ओलावा घेत
कस्तुरी भरली थेंब न थेंबात
धरतीशी नभाचे मीलन जोमात

चिंब चिंब ओल्या पानाफुलांच्या राशी
हृदयी प्रीतीचे अंकुर देशी
ये रे ये रे पावसा,तुझा ऋतू अनोखा
गगनात उंच माझ्या मनाचा झोका

दि.२५/०६/२०२२
सायं ०७.३४ वा.



## (३७)
## कोटी सुंदर पिसारा

एक ढग दिसलेला
आकाशात लपलेला
त्याच्या मनात मैत्रीचा
गोड विचार आलेला

दोन दोन झाले ढग
आता तीन चार पाच
खाली वनात मोरांचा
धुंदावला छान नाच

सहा सात सरी आल्या
सरसर बरसल्या
आठ नऊ आठवांच्या
चिंब पापण्याही झाल्या

दहा वीस वेळा मीही
मना किती समजावू
तेही उतावीळ होई
भेटण्यास सखी पाहू

तीस चाळीस विचार
गलबला मनी होई
पन्नाशीचा पोक्त वारा
थाऱ्यावरी नच राही

साठ सत्तर आवाज
नभी गर्जनांचा थर
झटका अन्शी नव्वदीचा
दामिनीचा वरचे वर

शंभर शंभरीची सरी
झेलू थंड अंगावरी
आत चेतवीत आग
मदनाची शरगिरी

अशा शतश: धारा
सहस्राच्या भावगारा
लक्ष क्षण साठवावे
कोटी सुंदर पिसारा
कोटी सुंदर पिसारा

दि.०६/०७/२०२२
सकाळी ११.०० वा.



## (३८)
## म्हणूनही मी बरसून जातो

कित्ती काहीबाही साचलंय
बघ त्या मेघाच्या मनात
शुभ्र धवलसं रूप गोजिरं
काळंभोर झालंय क्षणात

दडपून ठेवत त्यानेही
केलाय खूप दूरवरचा प्रवास
दुःख बरसलं तरी कामना
मृण्मयी येऊ दे ना सुवास

ज्या धारा बघ उरात दडल्या
बळ कधी तर शल्य कधी
कोसळणे कधी कुणा नकोसे
कधी बरसणे साफल्य

कधी वेदना होत गर्जना
टाहो फोडून रडतो मी
कधी प्रियेच्या केशकुंतली
थेंबकळ्याही पाडतो मी

कधी आषाढी वारीमध्ये
वारकऱ्या पायी पडतो
कधी वळवाचा होत सडाका
ग्रीष्माला मी सुखावतो

कधी कारण तर विनाकारण ही
बरसण्यास मी तरसून जातो
कधी मनाला माझ्या वाटले
म्हणूनही मी बरसून जातो

दि.०८/०७/२०२२
दुपारी ०१.५८ वा.



## (३९)
## परमेशाचे देणे सुंदर

ईश बोलतो ईश डोलतो
कळी फुलातून खेळ चालतो
वारा सांगून जातो काही
पातीवरती लेख लिहितो

फुलाफुलातील संदेशाचे
करण्या वाचन येती पाखरे
पायांवरती पत्र चिकटते
नवे बीजही मग अंकुरते

रंग वाहती ढंग वाहती
फूलपाखरे कौतुक पाहती
गुणवंताला जाण गुणांची
मधुमक्षिका मधी नाहती

गंध सुगंध नि परिमळ वाहून
वारा जातो गंधित होऊन
बीज लाभता या धरणीला
ऋतू फुलण्याचा येतो डवरून

स्वर्गामधले सूर रेशमी
सृष्टीमधुनी जाती रंगुनी
परमेशाचे देणे सुंदर
ज्याचे त्याला यावे कळुनी

दि.२२/०७/२०२२
सकाळी ०९.५८ वा.



## (४०)
## कधी थेंब हा

हा लकाके हा चकाके
थेंब सुंदर गोडुला
हिरा की मोती लोम्बणारा
पानावरती पहुडला

पानोपानी हर्ष वाहतो
थेंब बागड बागडे
पावसाच्या ज्या खुणा त्या
थेंबा थांबुनी पहा गडे

स्वच्छ झाल्या वेली झाडे
स्वच्छ पाने हिरवीगार
स्वच्छ झाल्या भुईवरी ही
लाज पसरे हिरवी शार

ऋतू पांघरतो नवी नवलाई
चातक होई तृप्त
किती दिसांची तहान भागे
थेंब थंड संतृप्त

कधी वाटते पानुकलीच्या
गालावरची खळी
कधी थेंब हा दवराणीच्या
बगीच्यातली कळी

दि.०२/०८/२०२२
रात्री १२.३९ वा.



## (४१)
## घे नमन सवितृदेवा

मी बिंब पाहिले त्याचे
नारायण मावळतीला
निघे रंग सोनेरी लेऊन
जणू हासत निजसदनाला

दिनमणी तळपतो नित्य
तो प्रकाश ऊर्जा दाता
सायंकाळी कर्तव्ये
संपवून दिपवे जाता

असो उदयकाळ की अस्त
तो सदोदित हो व्यस्त
तेजाचे अंगी सत्त्व
निज तळपत ठेवा स्वत्त्व

किती आड आले आभाळ
काळ्या ढगांचा सुकाळ
तरी त्याचे तेज ना लपते
तो आणतोच न सकाळ

आधार केवढा त्याचा
सृष्टीला पोसत राही
तो नजरेला दिसणारा
देवरूप नभातून पाही

घे नमन सवितृदेवा
तव तेजवारसा द्यावा
हे अंतर्मनही उजळू दे
तव अमूल्य मिळू दे ठेवा

दि.०३/०८/२०२२
रात्री ०८.१६ वा.



## (४२)
## शर्वरी गोडी

निळ्या जांभळ्या शालूमध्ये
नभराणी सजलेली
आणि दवाच्या वर्षावातच
चिंब चिंब भिजलेली

नक्षी चांदण्या त्या शालूवर
चंद्र असा भाळला
रोज निशीला एक सोहळा
शुक्लपक्षी चालला

दूर सारुनी ढग पडद्याला
सौंदर्याचा झरा
नितळ जळातील प्रतिबिंबातही
निशा लाजते जरा

चुप्प जाहल्या वेली पानुल्या
झाडे झाली स्तब्ध
रातराणीच्या मोहिनीवरती
शशी होतसे मुग्ध

त्याचे गाली हळूच हासणे
चांदणे बरसून जाते
कृष्णपक्षी पण रजनी वेडी
चंद्राला तरसून जाते

कधी गाढ आलिंगन आणि
कधी विरह हा दुष्ट
नको कधी लागण्या तयांच्या
संसाराला दृष्ट

म्हणून काळीशार नेसते
निशा अंधारी साडी
ते दोघांचे प्रेम केवढे
केवढी शर्वरी गोडी

दि.२३/०८/२०२२
सकाळी ०९.३३ वा.




## (४३)
## हिरव्या पोपटी रानात

हिरव्या पोपटी रानात
गुज सांगते कानात
हवा डोलविते फांदी
सळसळ ही पानात

खाली गवतफुलांची
दाटीवाटीनं फुलवाई
गोड हसू गाली त्यांच्या
खळखळून खळी आली

वर नभात पाखरांची
धुंद सफारी चालली
खाली नजर टाकती
कुणी हिरवाई गाळली

कसे देखणे दिसतेत
धीरगंभीर डोंगर
निळे हिरवे पांढरे
धुक्या धुक्यास पांघर

झाडं ऐटीत उभी ही
जणू राखतेत रान
कसा बहर येताच
वाढे ज्याचा त्याचा मान

दि.०९/०९/२०२२
रात्री १०.३९ वा.




## (४४)
## हळव्या रेशीमगाठी

हिरव्या हिरव्या रानामध्ये
सकाळ थांबे जरा
मऊ मल्मली वाटेवरती
रेंगाळते ती जरा

पुन्हा सोसणे दगड मोठाले
रखरखणारे ऊन
जागा ओसाड्या विराण जंगल
रुक्ष सारे वरून

अशी सुखाची जरा लाभते
विसावण्याला जागा
संपून जातो क्षणात एका
उभ्या जन्माचा त्रागा

पाने बोलती कानी काही
मनात हलचल होते
दडून राहिल्या प्रीतीने मग
काळीज चंचल होते

वरून झाडे देती सावली
उन्हे कोवळी येती
ऊब वेगळी जाणवते ती
जगी वेगळ्या नेती

रोज सकाळी सकाळ थांबे
इथे दवांच्या साठी
जुळून येती कितिकितीशा
हळव्या रेशीमगाठी

दि.२७/०८/२०२२
सकाळी ०८.३९ वा.



## (४५)
## लुभविते काजवी राग यामिनी

अंधाराच्या स्वागताला
काजव्यांची दीप अवली
ती असो रजनी ही चांदणी
अमावस्येची रात्र ओवली

टिमटिम टिमटिम दिवे चमकती
अंगावरती प्रकाश गाव
आपल्यामध्ये तेज असे तर
उजळून जाते तेजल नाव

किती असू दे रात अंधारी
किर्र्रर्र किड्यांची साथ तिला
किती एकटी क्षणात वाटे
क्षणी काजवी हात तिला

चमचम चमचम दिवा इवलुसा
दमकत काजवे उडती सारे
जीव केवढा ज्योत केवढी
क्षण रात्रीचे होतील प्यारे

आकाशातील नक्षत्रांची
सुंदर चादर कुणी अंथरली
निशापती येऊन पाहतो
तमस्विनी भुवी हो मंथरली

अशी क्षपा सुंदरा मोहिनी
लुभविते काजवी राग यामिनी
अनुरागाच्या आळवी रागा
लुकलुक करते तन्वी दामिनी

दि.२८/०८/२०२२
रात्री ०७.५७ वा.



## (४६)
## काय सांगावे नभाला रंग आले

काय सांगावे नभाला रंग आले
घुसळुनी स्वर्गातले क्षण संग आले
सांडला आहे खजिना हा कुबेरी
वितळुनी या कांचनाच्या रस रसेरी

तो आला तिकडून धावत श्याम वेडा
गर्द निळसर वर्णाचा आकाशी वेढा
एक मागून डोकवे तो रंग सुंदर
तांबडे की केशराचे अंग अंबर

शुभ्र रंगाला लपविती रंग सारे
जलदांचे धावणारे हो धुमारे
सांडले कुपीतून त्याच्या रंग का रे
कुंचल्याचे मारताना तो फटकारे

वाटते जणू युद्ध सुरू हे झाले का रे
एकमेकांवर ढगांचे मारा भाले
रंग विजयी रंग हरल्या भावनांचे
आपुले हे युद्ध चाले स्पंदनांचेल

ही निशा उदयास येता तम पसरतो
सूर्य वेडा तेज आपुले कुठे विसरतो
संधिकाळी संधी साधून सांज येते
जीवनाचे रंग पाहून धुंद होते

दि.०२/०९/२०२२
सायं ०७.३० वा.



## (४७)
## रंग प्रीतीचे मी सारे माळलेले

हे उतरले इंद्रधनू मज अंगणातच
घेतल्या साऱ्या दिशा त्याने कवेतच

फैलावले ते तेज सुंदर रंगारंगी
वाटते जणू सूर्य आला त्यास संगी

या धरेवर अर्धगोलातून झुकले
पाहिले ना ज्यांनी दिव्यतेस मुकले

ही आभा पहावी प्रभा अशी फाकलेली
स्वर्गसुंदरीने तनू ही झाकलेली

कोण कोणावरती आहे भाळलेले
रंग  प्रीतीचे मी सारे माळलेले

दि.०२/०९/२०२२
रात्री ०८.१४ वा.



## (४८)
## त्या हृदयाने हे हृदयही चिंब

तलम तरल किती कवळे कवळे
गर्भरेशमी स्पर्श भावले
या पानांच्या पारदर्शी
सुंदर हृदयी हृदय मावले

रंग गडदही रंग फिके ते
सुरंगी चित्रही असे दिसे ते
हे कवळेपण आरंभाची
नांदी होऊन सृष्टी नांदते

असेच हळवे मनही असावे
वाऱ्यासंगे तेही हसावे
रंग सारे सारे ते आपुले
कृष्ण काळे ढवळे विलसावे

जाडेभरडे पोक्तपण आले
जीर्ण शीर्ण म्हातारपण झाले
तरीही मनात कोमल कवळ्या
नाजूक बालपणाला जपले

शरीर असू दे परिपक्व किती
मन असावे मृदुल मृदुल अति
स्वच्छ सरळ पडता प्रतिबिंब
त्या हृदयाने हे हृदयही चिंब

दि.०८/०९/२०२२
सकाळी ०७.३४ वा.



## (४९)
## चांदणधागे विणू चांदणे

किरण शलाका खाली सांडल्या
चांदण्यातल्या रात्री गुंगल्या
जळही झाले दुधाळ सारे
मनी कल्पना धुंद रंगल्या

चंद्र वाहतो पघळून जाऊन
नदी चांदण्याची ही होते
मस्त कोसळून जाती धबधबे
हृदयी कामना जागी होते

जळात सोडून पाय बसावे
प्रियवरा संगती तुझ्या असावे
शांत सुवनी या चांदणे प्यावे
रम्यतेस साठवूनी घ्यावे

खळे केवढे त्याच्या भवती
ओथंबून चांदण्याही जाती
लज्जा होते तरल पांढरी
पारदर्शिता लेत्ये प्रीती

गगनी चांदणे मनी चांदणे
वनी चांदणे तनी चांदणे
चांदणधागे विणू चांदणे
आल्हादाचे भांडार चांदणे

दि.०९/०९/२०२२
रात्री ०९.१८ वा.



(५०)

## नेहमीच राहतील बहर ऋतूंचे

अशी फळे ही लगडून येतील
त्यासाठी हवी किती साधना
त्या इवल्याशा बीजासाठी
सहज सोपी असते का गाढना

नुसते गढून घेणे नसते
स्वत्व विसरुनी रूपांतरणे
सारे स्वतःचे द्यावे सोडून
तेव्हा कोंबाने वर तरारणे

ते तरी असते का हो सोपे
जीव इवलुसा अनंत धोके
कधी उधळुनी येती संकटे
कधी हवेचे अलगद झोके

तरीही वाढणे वाढत जाणे
आत अंतरी आस जगविणे
सोस सोसूनी उन्हाचे चटके
खात वादळी तडाखे फटके

आपुल्या मुळांशी घट्ट जोडुनी
नाते दृढतम असे सांभाळून
ऋतू सहाही अंगी झेलून
बहार येते फळे फळाळून

तेव्हा तर मग नकोच गर्व
झुकून वाकून घालवी पर्व
पुन्हा शिशिरा हाती जाणे
गळून सुकून वसंत पहाणे

फळे सुखाची येतील जातील
सुखासुखी ती घ्यावी चाखून
अन गळतीचे दुःखही जाईल
थोडी जागा त्यालाही राखून

सुंदर जगणे झाडफुलांचे
ऋतू सृष्टीचे आणि फळांचे
कोणीच नाही हट्टा पेटत
नेहमीच राहतील बहर ऋतूंचे

दि.०९/०९/२०२२
रात्री ०९.५४ वा.



## (५१)
## आस उरतंच नाही

नजर पडे तिकडे हे सुंदर
दृश्य लुभावणे मोहक
किती निवांतसे क्षण विसावून
जळात नभ ही गाहक

स्वच्छ नितळ हे गगन बोलके
प्रतिबिंबातून डोले
कसे आनंदे तेही घेते
लहरींवर हिंदोळे

हिरव्या हिरव्या रेशीम कहाण्या
शालू घेऊन येती
वर गुलाबी फुले उमलुनी
नक्षी रेखून जाती

हळूच येऊन फूलपाखरे
गुज शोषुनी घेती
गावोगावच्या फुलराण्यांच्या
मनी राहुनी जाती

झाडे वेडी अंगावरती
उन्हे सोनेरी घेती
थंड गारवा मनातला जणू
छाया होऊन देती

किती रमावे इथे जीवाने
मन भरंतच नाही
नाही कामना अपुरी कुठली
आस उरतंच नाही

दि.११/०९/२०२२
रात्री ०९.४३ वा.



## (५२)
## ठेऊ सांभाळून ठेवा

झुंजूमंजू व्हता व्हता
रात सपान टाकते
डोळं उघडून तवा
निशा प्राचीला देखते

देत अळोखे पिळोखे
जाग अलवार येती
स्वागताला पहाटंच्या
गीत पाखरं बी गाती

रंग काळोखी संपून
दिशा तांबड्या व्हत्यात
सकाळच्या पारी साऱ्या
येली दवात न्हात्यात

येडी लाजतीया उषा
तिचा सुर्व्या येतोया
पाठलाग प्रेमापायी
देव असून होतोया

रंग तिच्या गालावर
असा सांडता गुलाबी
रंग कवळे घेऊन
उधळीतो नवी छबी

पाखरांनी कुजबुज
केली समद्या रानात
अरुणाच्या रथामंदी
स्वारी येगळ्या जोमात

किती पारा चढतोया
रागे मध्यान्हीस देवा
परि रामाच्या पाऱ्यात
किरणांचा वाटं हेवा

झुंजूमंजू व्हतं जवा
एक दिस येतो नवा
नव्या उमेदीचा चला
ठेऊ सांभाळून ठेवा

दि.१२/०९/२०२२
सायं ०५.५० वा.



## (५३)
## असे सौंदर्या टिपावे

फेकफेकते हे नभ
रंग सोनेरी केशरी
येते दौडत सकाळ
कशी गोजिरी हासरी

तिचा ठरलेला असे
दिनक्रम सुंदरसा
रूप न्याहळत बसे
होत स्वतःचा आरसा

कधी या रंगाची साडी
कधी त्या रंगाचा शालू
सांजवेळ होपावेतो
रूप निखरे लाजाळू

कधी मेघ माळलेले
जल देणारे हो काळे
कधी तडिता चमके
विणकाम न्यारे चाले

कधी स्वच्छसे पातळ
शुभ्र निरभ्र पांघरे
फिके रंग पायघड्या
सूर्य त्यावरती फिरे

काढे नाजुक कशिदा
अवकाश लाभताना
रोज शृंगार चालतो
दिनराणी लाजताना

असे सौंदर्या टिपावे
नजरेत साठताना
जरीकाठ इंद्रधनू
क्षणभरे गोठताना

दि.१६/०९/२०२२
सकाळी ०८.०२ वा.



## (५४)
## त्यासम तोचि चित्रकार असे

अशी सुंदरी ही स्वप्ननगरी
कधी लाभावी मजला
निळ्या निळ्याशा जळात निळसर
असे गाहणे मजला

असे वाटते स्वर्ग उतरला
धरणीवरती अहा
रूप नितळसे मोहक सुंदर
मोहून जाऊन पहा

इथेच असतील अप्सरा कुणी
लावण्याच्या खणी
एक तरल बघ भाव उमटतील
वीणा छेडिली कुणी

हिरवी हिरवी ही हिरवाई
बरवी बरवाई
शुभ्र प्रासादे उंच गोपुरे
लोभस वनराई

इथे उतरती मेघ निरंतर
बेट सुखाचे हे
प्राशून घेती जळ जादूचे
बरसून देण्या ते

असे वाटते काळही थांबे
भाळून सौंदर्या
स्थिर चित्त अन अंतःकरणी
किती मधुर चर्या

त्यासम तोचि चित्रकार असे
रंग कल्पनांचा
दिव्य अलौकिक चित्र रेखितो
छंद रम्य त्याचा

दि.१९/०९/२०२२
सकाळी १०.२२ वा.



## (५५)
## आधी आकारते माय

गाव गजबजलेलं
झाड कुजबुजलेलं
किती पक्षी गोळा झाले
जणू म्हायेर वाटलं

अंगाखांद्यावर झुलं
घरट्यांनी पडं भूल
टांगलेल्या संसारांना
देव रक्षणाची झूल

सुगरणीची निवड
काढा देखण्या सवड
किती कलाकुसरीनं
तिचा महाल ह्यो घडं

हिरव्या हिरव्या फांदीवर
घरकुल बांधलेलं
आत शिल्प देखणंच
पिलांसाठी सांधलेलं

तिनं प्रेमानं संसारी
जीव नवं आणलेलं
चिवचिव सुरू व्हता
झाड आजोबा झालेलं

गाव तिचं होत जाय
धीर इश्वासबी हाय
पिल्लं आकारा येतील
आधी आकारते माय

साऱ्या प्रेमामंदी चढं
प्रेम माय करतीया
जीव जीवाला देऊन
जीव टाकून उरतीया

दि.२८/०९/२०२२
सकाळी ०७.५० वा.



## (५६)
## नातं अस्संच असावं

तृण पाचू अंथरले
वर सोनाळी रूपाळी
चढाओढ चाललेली
भुईवर नि आभाळी

वर नक्षत्रांची रात
इथं काजवी खैरात
वर ढग धावणारे
इथं पाऊस भरात

तेज सोनेरी किरणे
चंद्र सूर्य देत राही
वसुंधरा ते सोहळे
रोज नव्यानेच पाही

तिथं इंद्रधनुष्याची
एक कमान रेखता
इथं प्रतिबिंब मनी
सप्तरंगाचे देखता

तिथं आभाळाची माया
देत राही छत्रछाया
इथं धरित्री जागते
साऱ्या जीवा पोसावया

कोणी कोणा वरचढ
नाही कधीच ठरत
आदर परस्परा
सुख नव्याने भरत

नातं अस्संच असावं
एकमेका सावरावं
एक अंथरूण घाली
दुजं पांघरून व्हावं
समझोत्यानं चालावं

दि.२८/०९/२०२२
सकाळी ०९.३७ वा.



## (५७)
## याला रम्यता हे नाव

किती ताजे ताजे सारे
भुलविती नवे वारे
गवताच्या दुशालीत
वसुंधरा रूप न्यारे

ऊन पावसाच्या खेळी
इंद्रधनू  गे आभाळी
रंग कारंजे उडती
अशा रम्य मोहकाळी

शुभ्र पांढऱ्या ढगांचे
मऊ कापूस पिंजावे
निळ्या आकाशात छान
चित्र संदेश गुंजावे

कानी सांगते ती काही
क्षितिजाशी प्रियवर
एक आनंदाची रेघ
हास्य उमटे लकेर

सारे सारे बोलतात
भाषा मधुर आगळी
कळण्यास मन मऊ
जरा मांडणी वेगळी

थोडी लोचने मिटून
साठवावे सारे सारे
रंग सुखाचे कोणते
येथ थांबून पहा रे

शब्द निःशब्द होतात
मूक डोलतात भाव
मन निवांत होते नि
याला रम्यता हे नाव

दि.२९/०९/२०२२
सायं ६.३७ वा.



## (५८)
## शरदाच्या चांदण्यात

शरदाच्या चांदण्यात
तुझे माझे एक बिंब
तिथे सुधाकर होई
प्रीत अमृताने चिंब

शरदाच्या चांदण्यात
तुझ्या बाहुमध्ये जुई
माझे स्पर्श चांदण्याचे
लज्जा मृदु छुईमुई

शरदाच्या चांदण्यात
माझी लावण्य माधुरी
खुललेली निशा सवे
होय कामनाही पुरी

शरदाच्या चांदण्यात
चांदण्यांची चमचम
लक्ष्मी नुपूरांचा नाद
गुंजे कानी छमछम

शरदाच्या चांदण्यात
घट्ट विणलेली नाती
सौख्य देते तुला राजा
जप काळजाची पाती

दि.०१/१०/२०२२
सकाळी ०७.३८ वा.



## (५९)
## रोज दिस उगवता

लाली तांबडी फुटली
उधळण आकाशात
मनी भाव उमटले
एक नव्या प्रकाशात

दिन उगवे मावळे
त्याचे सुंदर सोहळे
छटा वेगवेगळ्या नि
क्षण नाजूक कोवळे

किती बांधावे वाटले
तरी मुक्त वेळ काळ
रोज उगवे नवीच
निशा मिटता सकाळ

त्याचे गणित वेगळे
आपणासी नाही ठावे
रंग जो ही तो देतो ना
स्वीकारावे मनोभावे

आज सुख सांडताना
उद्या दुःखही मांडतो
कर्म आपुलेच आणि
देवाजीला तो भांडतो

रंग अंतरी जाणावे
भरभरूनी जगावे
जन्म जन्मांतरी खुणा
पटल्यागत वागावे

रोज दिस उगवता
उगवावे हो आतून
जायचे मिटून तेव्हा
अलगद जा मिटून

दि.०२/१०/२०२२
सकाळी ०९.५२ वा.




**(६०)**

## सृष्टी माया रोज देते

खळखळत्या पाटाला
झुळझुळणं विचारा
गोड चिमुकल्या झऱ्या
तुझा कोवळा पुकारा

इवल्या इवल्या गवतुल्या
तुझा रुबाब दिसावा
फुलाफुलातून गंध
खदखदून हसावा

आज थंडी हुडहुडी
थोडी हवेला भरावी
वारा जोजविता तिला
शाल ऊब पांघरावी

झाडं वेली नाचतील
धुंद होऊन सुखाने
पक्षीगण राग सारे
आळवतील मुखाने

चित्त एकरूप थोडं
थोडं शांत की असावं
सृष्टी माया रोज देते
तिला पारखं नसावं

दि.०७/१०/२०२२
सकाळी ०९.४३ वा.



## (६१)
## जोडू या सख्य शाश्वत

मनाला रोज सांगू
एक मैत्री करावी
सोबती सृष्टीच्या या
वाट सुंदर धरावी

किती हे गोड आहे
सूर ऐसें जुळावे
निसर्गाशीच सारे
बंध पक्के कळावे

असे हे सख्य आहे
चिरंतन चालणारे
असे चैतन्य पाही
कणोकणी डोलणारे

रोज उत्साह देई
सृष्टी सारी तजेली
किती उपकार करते
अशी ही देख माऊली

निसर्ग हा बाप होतो
पोसुनी धन्य करतो
कृतघ्न न व्हावे आपण
घट सुखाचे तो भरतो

जोडू या सख्य शाश्वत
मोद पसरेल सारा
कानी मग ऐकू येई
गीत गाणारा वारा

दि.०८/१०/२०२२
सकाळी ०६.५७ वा.



## (६२)
## चंद्र उतू जाताना

चारू चंद्रमा तुझी लालिमा
आज खुलुनी येते
को जागर्ति विचारते ही
लक्ष्मी रात्रीला फिरते

आज सुधाघट चंद्र बरसवी
नभी  मोहवत राही
अशी मोहिनी या जगतावर
शरद पौर्णिमा पाही

आरोग्याचा मंत्र जागरण
कोजागिरीच्या राती
शशी किरणांच्या मंडपातली
खुली खुलणारी नाती

अशी कळावी प्रीत मृदुलशी
मन हळवे असताना
हात प्रिया तुज हाती असावा
चांदण्यात बसताना

उधाण येते मज हृदयाला
चंद्र उतू जाताना
तुला पाहते हळुवार मी
सुधांशु मम होताना

रात्री १०.३५ वा.
०२/०१, १६:१९



## (६३)
## कोजागिरीला दे दान

तुला कसे सांगू बरे
काल चांदवा उतरे
माझ्या घरट्यात आला
मन चांदणं झालं रे

त्याची हौस शरदाची
आत कुपी अमृताची
आज वेगळा वाटला
जवळून की भेटला

म्हणे जागणार आज
रातभर आहे तू ना
म्हटलं जगणार आज
जणू आयुष्यच मी ना

त्याच्या चांदण्यात सारा
जीव माझा झाला गोळा
कशी दिलीस रे बाबा
सांग प्रीत कशी तोळा

म्हणे मीही तळमळे
खऱ्या खऱ्या प्रेमासाठी
एक राधा ती होती ना
जशी सावळ्याच्या साठी

असे प्रेम नाही दुजे
त्रिखंडात सदा गाजे
साक्षी होता साऱ्यांसाठी
आस माझ्या मनी जागे

आज मोडल्या मी सीमा
तुला प्रतिबिंब देण्या
कवयित्री तू लाडाची
काव्यचांदणे ते पिण्या

मांड माझ्याही व्यथा तू
प्रेम भंगल्या कथा तू
कोजागिरीला दे दान
चांद चकोरासी गे तू

दि.१०/१०/२०२२
सकाळी ०९.३२ वा.



## (६४)
## चांदणं

चांदणं
शरदात हसणारं
भूल भूल भुलवणारं
मस्त धुंदीत मनास खुलवणारं

चांदणं
कोणासाठी पडलेलं?
प्रत्येकाच्या उधाण अंतर्मना
प्रीतीच्या फेसाळणाऱ्या चंचल भावना

चांदणं
त्याची मक्तेदारी
शुभ्र हास्याची उधळण
रात्रीला आठवांना देणारी उजळण

चांदणं
विरहाचा जाळ
रूपानं आल्हादी नितळ
जाळणारं सांगा कसं शीतळ?

चांदणं
मनाचा दिलासाही
प्रिय प्रियतम वाटणारं
सखा म्हणून नित्यनेमानं भेटणारं

दि.११/१०/२०२२
सकाळी ०८.१३ वा.
शिरोमणी काव्य



**(६५)**

## कशी उतराई त्याची

निळ्याशार पाण्याकाठी
पाचू लयलूट झाली
झाडं रांगेत उभी ही
कंच हिरवी दुशाली

त्यांच्या सावल्याही शांत
शांत सागराची गाज
निळ्या दुलईत नग
झाले गुडुप की आज

इवले इवले तृणांकुर
वृक्ष सावल्या झेलून
जणू मोठाले झालेत
तरु झावळ्या पेलून

किती अनुशासनात
सारा निसर्ग राहतो
मानवाकडून आस
तीच बाळगून जातो

देतो आनंदाच्या खणी
पखरण ती सुखाची
मायबाप हा निसर्ग
कशी उतराई त्याची

दि.११/१०/२०२२
सायं ०६.३४ वा.



(६६)

## आकाशीच्या निळाईने

आकाशीच्या निळाईने
सागराची खोली प्याली
प्रतिबिंबाची साजिरी
निळी साडी भूमी ल्याली

आकाशीच्या निळाईने
हृदयात जागा केली
एक विशाल नीलिमा
आसमंता भरू गेली

आकाशीच्या निळाईने
नीज निळी निळी झाली
स्वप्नं निळेशार होता
खुशी निळी होत आली

आकाशीच्या निळाईने
वृंदावनी रास झाली
गोकुळात सुख आले
वेदना जणु निमाली

आकाशीच्या निळाईने
गोरी राधा निळी झाली
कृष्ण बावरून गेला
जादू अशी निळी झाली
आकाशीच्या निळाईने...

दि.१३/१०/२०२२
सकाळी ०९.३२ वा.



## (६७)
## सोनभविष्य प्रकाशी

सोनउन्हांचा दसरा
रोज रोज लुटायाचा
तेज स्वर्गातले घेत
तम सारा फिटायाचा

सोनपिवळ्या उन्हात
सोनसळी आशा जागे
उषा येते हळुवार
तिची आभा सोनं फेके

सोनसोनुल्या कामना
ताज्यातवाण्या होऊन
रोज रोज पोसतात
अंगी बाळसं धरून

सोनपाखरांची नीज
सोनजळातले नभ
सोनपांघरून घेत
चकाकून जाई दव

रोज नव्या जगण्याची
पिटे दवंडी आकाशी
सोनआवाजाचे सूर
सोनभविष्य प्रकाशी

दि.१४/१०/२०२२
सकाळी १०.१७ वा.



## (६८)
## निसर्ग लावण्येची पेरतो

कमाल वाटे निसर्गातली
कुठून आणत असेल रंग
हिरव्या पिवळ्या झाडांचे हे
किती न्यारेसे दिसतायत ढंग

हिरवा रंग म्हटला तरी
छटा किती भिन्न भिन्न
गवत  सानुले पोपटी कवळे
झाडे गंभीर हिरवी पिन्न

पाने काही राकट हिरवी
काही मध्यम हिरवाईची
कुठे मुकणी ती ताजी हिरवी
वनराजी बरवाईची

कुठे शोभती पाने पिवळी
सोनसळी उन्हं ल्यालेली
कुठे लालसर छटा गुलाबी
कुठे केशरी झालेली

नाही कोणते वर्ज्य रंग ते
सौंदर्याची प्रत्यूषा
निसर्ग लावण्येची पेरतो
गुप्त काही बीज मंजूषा

दि.१९/१०/२०२२
सकाळी ०७.१४ वा.



## (६९)
## तृप्त अंतरीचे डोळे

गुल्म उमलून आले
कळ्या कळ्या त्या फुलल्या
हळुवार वाऱ्यासंगे
हिंदोळ्यावरी झुलल्या

मन बगीचा होताच
माळी आपणच व्हावे
रंग सुंदर विचारी
बीज पेरूनीही द्यावे

विवेकाचे खतपाणी
आनंदाची गात गाणी
झुळुझुळू पाट वाहो
आयुष्याच्या रम्य वनी

कधी उन्हाचे तडाखे
पाळंमुळं पक्के ठेवू
एक आतला आवाज
सदा ऐकूनिया घेऊ

कधी जोरदार धारा
बरसवतात गारा
भुईसपाट ना होणे
व्हावा स्वतःचा निवारा

वादळांचे सूं सूं धाक
मनसुबे बेचिराख
आहे एवढे सामर्थ्य
आत मनात तू झांक

बाग अध्यात्म उमले
जीव शिवासंगे डोले
काय जाणायाचे आता
तृप्त अंतरीचे डोळे

दि.२०/१०/२०२२
सकाळी ०७.४५ वा.



## (७०)
## असा वारसा परिमळांचा धरू या

उमलत्या फुलांचे असे ताटवे हे
मनातील उमलून आले भाव वाटे

कधी डोलती आतल्या स्व सुखाने
कधी हलवी वारा भाळलेल्या मुखाने

किती गंधकोशात जपले स्वतःला
तरी देत जाईल उधळून स्वतः ला

जमावे असे धुंद धुंदीत रहाणे
किती मस्त मस्तीत फुलती बहाणे

जगावे असे नित्य झोकून द्यावे
तूफान येताच वाकून जावे

न ताठरता कुठली नसावाच गर्व
सुकणे जरी पक्के ,जगण्याचे पर्व

चला ऐशी सुमने मनांना करू या
असा वारसा परिमळांचा धरू या

दि. २८/१०/२०२२
सकाळी ०६.४९ वा.



## (७१)
## पोरकेपणाला

कुठे वाट रानातली
आज चुकली
किती वृक्ष तुटले
ती झाडांना मुकली

असे शोधण्या ऊन
आले सकाळी
दिसले ना तरुवर
किरणांना त्या काळी

आडून दुसऱ्या
झाडांच्या चोरून
उन्हे हळहळली
स्वतःस पसरून

गमावला हकनाक
पुन्हा एक मित्र
संपेल कधी हे
वृक्षतोडीचे सत्र

आयुष्यी ज्यांनी
परोपकार केले
जरा ना दया ते
असे व्यर्थ मेले

चुटपुट कधी लागते
मज मनाला
किती कष्ट साहून
सृष्टी भोगते.. पोरकेपणाला

दि.२९/१०/२०२२
रात्री ११.५३ वा.




## (७२)
## उजळून येता तेज उजळते

वृक्षाच्या गर्भात उगवला, तेजोमय गोलक
उजळून आले भाग्य तयाचे, असे अनमोलक

कवेत घेता आले प्रभेला, कोण तो आनंद
सळसळ जागे पानोपानी,झुलण्याचा छंद

एक आतुनी प्रवाहित हो, अनामिक चैतन्य
पहाट होता अंधाराचे ,दूर सारूनी दैन्य

पुन्हा नव्याने जन्मा येते, एक एक पालवी
पुन्हा नव्याने नव्याच आशा ,नवी आस बोलवी

उजळून येता तेज उजळते,सबाह्य ते अंतरी
नमो सूर्यदेवा तू विराजित,आमुच्या मनमंदिरी

दि.०६/११/२०२२
सकाळी ०८.२२ वा.



## (७३)
## रंगरंगुल्या भाव छटा

या रंगांच्या कोशी रंगल्या
रंगरंगुल्या भाव छटा
संमेलन जणू भरलेले की
रंग राणीच्या उडत्या बटा

तिचे हासणे रंगामधले
तिचे लाजणे रंगभरे
तिचे वागणे रंगडौलाचे
जगणे तिचे जणू रंग खरे

ती रंगांची जणु सम्राज्ञी
चित्रकाराची साधना
भाव बोलती मूक कुंचले
कलाकार आराधना

असे वाटते तिचे वस्त्र हे
गर्भरेशमी रंगांचे
सारे सारे मिसळून जाती
होत भूषणे अंगांचे

रंगभारल्या उषानिशाही
क्षितिजावरती ओघळती
रंग स्वर्गीचे रंग सुंदरसे
धरी अधरी उरी पाघळती

दि.०८/११/२०२२
सकाळी १०.३९ वा.



## (७४)
## कसे सांगू रे धुक्या सख्या

धुंद धुंदला मोही प्रवास
कप चहाचा पसरे सुवास
हाती हात प्रिये तुझा असा
सत्य भास की भास आभास

हिरव्या हिरव्या पल्लवराण्या
नव स्वप्नांनी खुणावती
एक कल्पना स्पष्ट होतसे
अन्य सुखाने दुणावती

धुक्यात तू ती उभी शहारून
ये राणी तू कवेत ये
मिठी रेशमी तलम मोगरी
अत्तर विरते हवेत जे

दवबिंदूंची गळ्यात माळ नि
तनुवर फुलतील प्राजक्त
तू मी, मी तू जन्मोजन्मी
परस्परात ग आसक्त

कसे सांगू रे धुक्या सख्या मज
क्षण सुंदर तू करिशी बहाल
तुझ्यामुळे मी प्रियतमकोशी
भ्रमरासम बंदिस्त कमाल

दि.१०/११/२०२२
सकाळी ११.३० वा.



(७५)

## धुक्याची पहाट तू होऊन यावे

धुक्याची पहाट तू होऊन यावे
मी तुझ्या धुंदल्या क्षणात मजला झोकून द्यावे ।।
मी तुला पांघरून तुझ्यात दडून गुडुप होता
तू ऊब वेगळी होत दिलासे देऊन जावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।१।।
मी बाहेर बघणे सोडून सारे आत डोकवून
मलाच मजला लाभत जाणे असे घडावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।२।।
जे दूरदूरचे नको दिसू दे स्पष्ट ते सारे
मी तुला जवळून निरखून मुरवून मिरवून घ्यावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।३।।
मी असा बुडावा जणू युगाची निवांत प्राची
समजून उमजून तुझे गीत मी छेडून जावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।४।।
ते मंतरलेले क्षण सुंदरसे ओंजळीत अन
ओंजळ दवात बुडून धूसर सडे पडावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।५।।

दि.१०/११/२०२२
सकाळी ०९.३४ वा.



## (७६)
## होत रंगां संगती

हिरव्या पिवळ्या दालनातील
हिरवीपिवळी चित्राई
सप्तरंगाची कमाल घडते
फुले लालसर उमलाई

कोण असे हा चित्रकार जो
युगयुगातून रेखितो
देखणी ही चित्रशिल्पे
नवनव्याने लेखितो

रंग ना ओघळणारे
मनीही बसतील पक्के ते
चमक वेगळी जादुगिरी की
हुकुमाचे जणू शिक्के ते

रंगरंगातून रंगची
उमलून येतात ना
स्पर्श त्यांचे रंगभरले
हळवेपण देतात ना

एक रंग छटा किती
मज मनासी मोहवीती
बुडून जावे गढून जावे
होत रंगां संगती
होत रंगां संगती

दि.१५/११/२०२२
सकाळी ०७ .१२ वा.



## (७७)
## दाणा दाणा श्वास चालवी

ओंब्या गव्हाच्या हासऱ्या
वाऱ्यासवे कशा डोलती
आत भरते सत्त्व कोण नि
कोणा ओठी चालती

जीव जन्मा येती अगणित
सोय बघतो कोण त्यांची
किती मुखांची भूक शमवित
दाणे गणती कोण त्यांची

ही बहारच वेगळी जी
जगविण्यासाठी जगे
अन्न हेचि ब्रह्म मानून
रूप सुंदर जागवे

कोण भरतो पोषणाचे
रंग त्यातून आगळे
की स्वयं तो त्यात बैसून
पोसवितो सगळे

दाणा दाणा श्वास चालवी
श्वासासाठी सस्य दे
भूक पोटी पोट भरता
ओठी ओठी हास्य दे

साधना आराधना ही
रोज त्याची चालते
बीज रुजुनी कोंब येतो
जीवसृष्टी बोलते

दि.१५/११/२०२२
सकाळी ०७.४३ वा



## (७८)
## आता तुला पटले ना

आज नभ फेसाळले
किती किती उसळले
असे काय घडे बरं
चक्क उतू उतू गेले

रूप उतावळे त्याचे
रागरागावून गेले
सागराच्या मनी धस्स
अचानक काय झाले

झाला शांत तो समुद्र
लाटा आकाशात गेल्या
रुद्र रुपात नाचून
राग व्यक्त करू गेल्या

गेल्या ढगात बसून
ढग उमडून आले
असे अक्राळविक्राळ
एक युद्ध जणू चाले

सांग रोज खवळशी
भरतीने नाचतोस
मन भेदरले कधी
तरी का रे वाचतोस

तुला उसळणे येते
कसा भयानक दिसे
आज आकाशाच्या काची
रूप तुझे तुला हसे

असा वाईट दिसशी
नको होणे रे बेभान
जरा शांत नि निवांत
सांभाळावे तू इमान

रूप पाहता स्वतःचे
भयानक वाटले ना
नको भेडसावू जना
आता तुला पटले ना

दि.१५/११/२०२२
सकाळी ०८.१८ वा.



## (७९)
## स्वर्ग वेगळा कुणी पाहिला

अद्भुत सुंदर दृश्य केवढे
फिटे पारणे डोळ्यांचे
जळात नभ अन नभात सोने
सूर्य टाकतो किरणांचे

डोंगर माथ्यावरी टेकल्या
गर्द काळसर ढग पडद्याला
सारून बाजू दिनमनी डोकवे
स्वर्णशलाका पाडण्याला

काय देखणे चित्र वाटते
पर्वत रांगा करड्या छान
वाळुकेत रेघांची नक्षी
पोत मुलायम मऊसर खाण

बिंब जळातील खुलले आहे
तेज फाकले सोनेरी
तोयातील गर्दी मेघांची
करड्या काही चंदेरी

सृष्टीचे लावण्य अनुपम
जरा तिच्या समवेत रहा
स्वर्ग वेगळा कुणी पाहिला
इथेच तो अनुभवुनी घ्या

दि.१५/११/२०२२
सकाळी ०८.३६ वा.



## (८०)
## रोज सकाळी मोहमोहवी

याहून सुंदर काय असेल ते
सौंदर्याचे उमलती मळे
गर्द गुलाबी ओष्ठराग हे
नाहीत केवळ हो कमळे

वर माथ्यावर सुवर्णबिंदी
कांचन झडते नित त्यातून
सोने पसरले मुखश्रीवरी
देत झळाळी तिज आतून

बट नटखट ती उडे खगांची
वाऱ्यावरती झुलताना
कर्णफुले होऊन मेघही
पहा दिसती किती डुलताना

रोज सकाळी मोहमोहवी
लावण्याची सृष्टीराणी
तिचे नितळसे बिंब देखणे
उमटून जाते अंतरातुनी

सुरेख सुंदर अप्रतिम हे
शब्द तोकडे तिज पुढती
रोज नव्याने सौंदर्याच्या
पदव्यांवर पदव्या चढती

दि.१७/११/२०२२
सकाळी ०८.३२ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित "वैदिक साहित्याचा इतिहास" (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

**''साहित्यिक व्रत''** म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष (निसर्गावरील कविता) यांचा समावेश आहे. याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(देवभक्तीपर) – नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, (राधाकृष्ण) – रूप–स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (प्रासंगिक) – मंगेश, आंदण, (निसर्गपर)– पूर्वा, सृष्टीगंध, (चंद्र) – सुधांशु, (सूर्य) – दिव्यांतरी, (प्रीत – तिच्या मनातील कविता) – नादश्रुती, श्वेता, (सकाळ–संध्याकाळ) – लाघव वेळा, (वेळा) – तेंव्हा, (प्रेम – त्याच्या मनातील कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) – अळुमाळु, सुरभी, (पशु) – खाणाखुणा, (पक्षी) – वैष्णवी, (स्त्रीजीवन) – स्वामिनी, मृणालिनी, (धरती–आकाश) – प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) – मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) –श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) –प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता, (ललितलेख) – मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार ‘साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला’ भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ४८
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५५
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●